महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ गुरुवार, दि. ४ सप्टेंबर २०२५ ■

## डॉक्टरच्या घरी चोरीचा पर्दाफाश : मोलकरीणच निघाली चोर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :** डॉक्टरच्य घरी झालेल्या लाखोंच्या चोरीचा प्रतापनगर पोलिसांनी पदार्फाश करीत घरकाम करणाऱ्या त्यांच्या मोलकरीणला अटक केली आहे. पोलिसांनी तिच्याकडून चोरी झालेल्या मालाहून अधिक माल जप्त केला आहे. परी श्रीकांत भुजाडे (३०) रा. स्वरूप कॉलनी, स्वावलंबीनगर असे अटकेतील मोलकरीणचे नाव आहे.

गावंडे लेआऊट परिसरात राहणाऱ्या फिर्यादी डॉ. लीना राहुल नेमाडे (३७) यांचा मुलाचा ७ जून रोजी वाढदिवस होता. वाढदिवसासाठी त्यांनी बँकेच्या लॉकरमध्ये ठेवलेले दागिने काढले.

वाढदिवसाच्या कार्यक्रमात ते दागिने घातल्यानंतर काढून बेडरूमच्या कपाटात ठेवले. ७ दिवसानंतर कपाट उघडले असता ५ लाख ४६ हजार रुपये किंमतीचे सर्व दागिने गायब होते. त्यांनी घरी काम करणाऱ्या तिन्ही मोलकरणींना दागिन्यांबाबत विचारणा केली मात्र शोध लागला नाही. अखेर त्यांनी पोलिसात तक्रार केली.

पोलिसांना सुरुवातीपासूनच घरी काम करणाऱ्या मोलकरणींवर संशय होता. तिघींचीही सखोल चौकशी करण्यात आली. सुरूवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या मोलकरीणींनी खाक्या दाखवताच गुन्हा कबूल केला. यात परीने दागिने चोरी केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी परीकडून ६ लाख ८९ हजार ५०० रुपये किंमतीचे दागिने जप्त केले.

## लांबाच्या घर, कार्यालयाची सीबीआयकडून झाडाझडती

### पदाचा दुरूपयोग करून भावाला मिळवून दिले कंत्राट

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**
केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय) नागपूरच्या पथकाने अंबाझरी ऑर्डिनंस फॅक्टरीचे माजी उपमहाव्यवस्थापक दीपक लांबाविरुद्ध फसवणूक, गुन्हेगारी कट आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

गुन्हा नोंदविण्यासोबतच सीबीआयच्या पथकाने लांबाचे घर आणि कार्यालयात धडक देऊन प्रकरणाशी संबंधित कागदपत्र जप्त केले. झडतीदरम्यान तपास पथकाला जास्त रोख रक्कम सापडली नसली तरी कागदपत्रे आणि डिजिटल फाइल्स सापडल्या.

यंत्र इंडिया लिमिटेड कंपनीचे उपदक्षता अधिकारी डीकेटी गुप्ता यांच्या तक्रारीवरून सीबीआयने लाबांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुप्ता यांच्या तक्रारीनुसार, लांबाने उपमहाव्यवस्थापक पदाचा दुरूपयोग करून त्याचा नातेवाईक मोहित थोलिया याची फर्म ऑटोमेशन इंजीनिअरिंग अँन्ड इंडस्ट्रियल सर्व्हीर्सेसला नियमबाह्यरित्या नफा पोहोचवला.

कंपनी टेंडरसाठी अपात्र असतानाही लांबाने नियमांत बदल करून टेंडर जारी केले. सीबीआयच्या प्राथमिक तपासातही हे स्पष्ट झाले की, लांबा, त्यांचे कुटुंबीय आणि थोलियाच्या कंपनीमध्ये आर्थिक व्यवहार झाले आहेत. त्यानंतर गुन्हा नोंदविण्यात आला. थोलियाच्या कंपनीने बनावट अनुभव प्रमाणपत्र जमा केले होते. सीबीआयच्या हाती प्रकरणाशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे हाती लागली आहेत.

थोलियाच्या कंपनीकडून टेंडर मिळविण्यासाठी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची बारकाईने तपासणी केली जात आहे. सबळ पुरावे गोळा केल्यानंतर सीबीआयकडून पुढील कार्यवाही केली जाईल.

### दरोड्याच्या तयारीतील तिघे गजाआड

बेलतरोडी पोलिसांनीही ठाण्यांतर्गत ऑपरेशन ऑल आऊट राबवून दरोड्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारांच्या टोळीतील ३ सदस्यांना अटक केली. युवराज नारायण वर्मा (२३), रा. महाकालीनगर, संतोष उर्फ अकराबोटे पंडित गायकवाड (२५) रा. कैकाडी नगर, महेंद्र जगन मानकर (२०) रा. रामटेकेनगर, अजनी, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

# काँग्रेसचा वोट चोर, गद्दी छोड मेळावा तूफान

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**
भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदार याद्या व मतदान प्रक्रियेत मोठा घोळ घालून सत्ता मिळवल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. त्याविरोधात काँग्रेसचे बुधवारी नागपूर जिल्ह्यातील कामठीत काँग्रेसचा वोट चोर, गद्दी छोड मेळावा आयोजित करण्यात आला. मेळाव्यात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यात्रेतून पोहचले. त्यांच्यासोबत प्रदेश आणि जिल्या पदाधिकारी होते. सर्व मंचावर पोहोचल्याने येथे नेत्यांची चांगलीच दमछाक झाली.

मेळाव्यासाठी कामठीतील आंबेडकर चौकात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, सुनील केदार, खासदार श्यामकुमार बर्वे यांच्यासह बरेच खासदार, आमदार आणि पदाधिकारी हजर होते. येथून रॅली मेळावा परिसरात आली. त्यानंतर प्रदेशाध्यक्षसह इतर नेते मंचावर आले.

जिल्हा पदाधिकारीही मंचावर आल्याने तेथे गर्दी झाली. त्यानंतर नेत्यांना जिल्हा पदाधिकाऱ्यांना खाली उतरण्याची विनंती करावी लागली. यावेळी आमच्यावर नाव घेऊन उतरण्याची पाळी आणू नये अशी विनंती केली गेली. त्यानंतर काही पदाधिकारी खाली उतरले. परंतु गर्दी कायम होती.





दरम्यान भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदार याद्या व मतदान प्रक्रियेत मोठा घोळ घालून सत्ता मिळवली, असा काँग्रेस पक्षाचा गंभीर आरोप आहे.

या कथित मतचोरीची पोलखोल काँग्रेसचे खासदार व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुराव्यासह केली आहे. त्यानंतर काँग्रेसने देशभरात वोट चोर, गद्दी छोड आंदोलन सुरू केले असून त्याअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील कामठीत भव्य राज्यस्तरीय मेळावा आयोजित केला होता. त्यात नेत्यांच्या गर्दीने मेळावा तूफान झाला.

### महाराष्ट्रात मतचोरीचा पहिला प्रयोग नागपूर जिल्ह्यात

देशात सध्या मतचोरीचा मुद्दा गंभीर बनला आहे. परंतु महाराष्ट्रात मत चोरीचा पहिला प्रयोग नागपूर जिल्ह्यातील एका मतदारसंघातून सुरु झाला, असा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

नागपूर जिल्ह्यातील कामठी येथे आयोजित राज्यस्तरीय मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले, नागपूर जिल्ह्यातील भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे प्रदेशाध्यक्ष असतांना कामठी मतदार संघात गाव- गावात मतचोरी केली गेली. येथे एकाच खोलीतून पाच- पाचशे नावे मतदारयादीत समाविष्ट केले गेले. त्यामुळे कामठीत मतचोरीकरून हा प्रयोग राज्यात सर्वत्र राबवल्या गेल्याचाही आरोप, हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

उलटा चोर कोतवाल को डाटे ही म्हण मत चोरीच्या अनुषंगाने सिद्ध होत असल्याचे वारंवार पुरावे मिळत आहेत. निवडणूक आयोगच स्वतः उलटा कांगावा करत आहे. आता लोकशाही वाचवण्यासाठी व आपला संविधान अधिकार जागृत करण्यासाठी आपल्याला एक होण्याची गरज असल्याचेही सपकाळ यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदार याद्या व मतदान प्रक्रियेत मोठा घोळ घालून सत्ता मिळवल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. त्याविरोधात काँग्रेसचे बुधवारी नागपूर जिल्ह्यातील कामठीत काँग्रेसचा ह्यवोट चोर, गद्दी छोडह्ण मेळावा आयोजित केला आहे. मेळाव्यात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यात्रेतून पोहचले. त्यांच्यासोबत प्रदेश आणि जिल्हास्तरीय पदाधिकारी होते.



■ *वाडी : दत्तवाडी येथील विक्रम तिजारे यांच्या निवासस्थानी स्थापन झालेला गणपती बाप्पा*

## १.४० लाखाची घरफोडी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :** कुटुंब बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड, दागिन्यांसह एकूण १ लाख ४० हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी शैलेष धरमदास शेंडे (४०) रा. धनगवळी कॉलनी, भिलगावच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

३१ ऑगस्टच्या सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास शैलेष घराला कुलूप लावून कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख २० हजार, चांदीचे दागिने व मूर्ती, लॅपटॉप, घड्याळ आणि टीव्ही असा १,४०,५०० रुपये किंमतीचा माल चोरून नेला. शेंडे कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## नंदनवन येथे निःशुल्क चष्मे वाटप शिबीर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :** केडीके कॉलेज परिसरातील नंदनवन झोपडपट्टी परिसर येथे निशुल्क आरोग्य शिबीर तथा नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी गरजूंना चष्मे सुद्धा वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव व माजी नगरसेविका नयना झाडे यांनी केले होते यावेळी कार्यक्रमाला विधान परिषदेचे आमदार अभिजीत वंजारी व काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते अतुल लोंढे प्रामुख्याने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता सारिका दुपारे, बेबीनंदा गाडेकर,राकेश कनोजे, कुमार बावनकर, दीपक राऊत, जया पराये, सुकेशनी मेश्राम, रक्षणा दहिवले, सारिका अंबादे आदींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला भाऊसाहेब मुळक आयुर्वेदिक कॉलेज येथील डॉक्टर व सुप्रसिद्ध ऑथोर्पेडिशन डॉक्टर पियुष नाशिककर व डॉक्टरांचे सहकार्य लाभले.

## तुंबलेले चेंबर अखेर न. प. ने केले मोकळे

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. ३ :**
वाडीत चेंबर तुंबल्यामुळे घाण पाण्याने खड्डे बुजले अशा आशयाची बातमी महासागर मध्ये मंगळवार २ सप्टेंबर रोजी प्रकाशित होताच वाडी नगर परिषद जागे झाले. मंगळवारीच मशीनच्या साहाय्याने परिसरातील तुंबलेले चेंबर मोकळे केले.



**महासागर दखल**

वाडी नगर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ८ (माजी वार्ड क्रमांक १३) येथे सार्वजनिक संडासचे चेंबर चोकअप झाल्याने मागील अनेक दिवसापासून घाणपाणी थेट नागरिकांच्या दारासमोरुन वाहत होते. त्यामुळे नागरिकांचे जीवन दूषित झाले होते.

तुंबलेल्या चेंबरमुळे रस्त्यावरून वाहणारे घाण पाणी नागरिकांच्या घरांपर्यंत पोहोचत होते, तर पावसाळ्याच्या सुरुवातीला या भागात तलावासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. या समस्येमुळे परिसरात डेंग्यू, मलेरिया सारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण होण्याचा गंभीर इशारा नागरिकांनी दिला होता. विशेषतः, चेंबर जवळील बोरवेलमध्येही घाण पाणी मिसळल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. नागरिकांनी अनेकदा नगरपरिषदेत तक्रार केली असता देखील काही उपाययोजना होत नव्हत्या. शेवटी तरुण भारतमध्ये बातमी प्रकाशीत होताच चेंबरच्या कामाला गती मिळाली. या बदल सामाजिक कार्यकर्ते जेम्स फ्रान्सिस, शरद इंगळे, खुशाल सोरते, शिवम राजे, नारायण गोतमारे, प्रमोद तराळेकर, सुनील मंडाले, राजु पहुरकर , सुबोध शर्मा, बबन ढोबळे, भानुसे आदींनी महासागरचे आभार मानले. उपसा मशीनद्वारे तुंबलेले चेंबर रिकामे केल्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, दुर्गंधीचा प्रश्न काहीसा सुटला आहे.

## रामचंद्र महाराजांचा बेल्यात जयजयकार



### १३ वा पुण्यस्मरण सोहळा उत्साहात

■ **महासागर प्रतिनिधी**
**बेला, दि. ३ :**
प्रख्यात संत बालयोगी रामचंद्र महाराज यांचा पुण्यस्मरण व समाधी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कडाजना टेकडीहून महाराजांची निघालेली पालखी दिंडी यात्रा बेलानगरीत प्रवेश करताच भव्य दिव्य झाली. यात्रेतील असंख्य भजन मंडळी व हजारो भक्तांनी यावेळी रामचंद्र महाराजांचा जयजयकार केला. शुक्रवारला सायंकाळी महाप्रसादाने समाधी सोहळ्याची थाटात सांगता होईल.

संत परमहंस रामचंद्रबाबांची बेला जन्मभूमी आहे. परंतु त्यांनी आपली तपसाधना जवळच्या वेना नदी तीरावरील कडाजना टेकडीवर केली. तेव्हापासून बेला व कडाजना तीर्थक्षेत्र पावनभूमी ठरले. गेल्या १३ वर्षांपूर्वी महाराजांचे वैकुंठगमन झाले. तेव्हापासून दरवर्षी समाधी व पुण्यस्मरण सोहळा येथे उत्साहात साजरा केला जातो. महाराजांवर अपार श्रद्धा असणारे हजारो भक्तगण विदर्भात सर्वदूर आहे. ते यावेळी दर्शनासाठी आवर्जून हजेरी लावतात. अशी येथील महिमा आहे. टेकडीच्या पायथ्याशी कधीही न आटणारा विशाल डोह आहे. खडकाळ,विस्तीर्ण पात्रातून खळाळत वाहणारा नदीचा प्रवाह पर्यटकांना खुणावतो.

**धार्मिक सप्ताह साजरा**

पुण्यस्मरण सोहळ्याचे निमित्ताने यंदा २९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबरपर्यंत कडाजना आश्रमात धार्मिक सप्ताह भक्तीमय वातावरणात उत्साहात सुरू आहे. ज्ञानेश्वरी पारायण व हरीपाठ भजन नित्यनेमाने सुरू आहे. काल बुधवारला भव्य पालखी दिंडी यात्रा ' रामचंद्र महाराज की जय ' च्या बुलंद जयघोषात उत्स्फूर्त साजरी झाली. उद्या शुक्रवारला दुपारी ह भ प लक्ष्मण महाराज गुडवार गोपालकाल्याचे किर्तन होईल. त्यानंतर हजारो भक्त महाप्रसादाचा आस्वाद घेतील. समाधी सोहळ्याचे यशस्वीतेसाठी कमेटीची पदाधिकारी व इतर विश्वस्त मंडळी निस्सिम भक्त अथक परिश्रम घेत आहे.

## सरकारचा प्रतिनिधी आल्याशिवाय आम्ही उपोषण सोडणार नाही

**ओबीसी महासंघाचा निर्धार**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाने ३० ऑगस्ट पासून नागपूर येथील संविधान चौकात बेमुदत साखळी उपोषण महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजुरकर, याचे प्रमुख उपस्थितीत सुरू केले आहे. आज उपोषणाचा पाचवा दिवस आहे. खालील मागण्या घेऊन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण सुरु आहे.

मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना त्वरीत नुकसान भरपाई देण्यात यावी. ओबीसी मुलांना व्यावसायीक अभ्यासक्रमास १०० टक्के शिष्यवृत्ती लागु करण्यात यावी. गुणवंत मुलांमुलीना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ७५ विद्यार्थ्यांची संख्या वाढवुन २०० विद्यार्थी करण्यात यावी. महाज्योती या संस्थेकरीता एक हजार कोटी रूपयांची तरतुद करण्यात यावीयासह अनेक मागण्यांसाठी महासंघाने उपोषण सुरू केले आहे.

दरम्यान, शासनाचे प्रतिनिधी आल्याशिवाय उपोषण मागे घेणार नसल्याचा पवित्रा ओबीसी महासंघाने घेतला आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे संविधान चौकात सुरू करण्यात आलेल्या साखळी उपोषणाच्या पाचवा दिवशी या उपोषणाला सुनील सवाई, किरण नेरकर, वसंतराव राऊत, विजय ठाकरे, ओमकार चौधरी, रत्नाकर लांजेवार, बाबासाहेब भोयर, राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या उपोषणाला आज डॉ. परिणय फुके, शेषराव येलेकर, प्रकाश साबळे, राहुल तायडे, प्रवीण वानखेडे, अनिल ठाकरे, गुणेश्वर आरीकर, सोनोने सर, अनिल कंठीवार, राष्ट्रीय ओबीसी महासंघ जिल्हा गडचिरोली चे जिल्हा सचिव सुरेश भांडेकर, पुरुषोत्तम मस्के, प्राध्यापक त्र्यंबक करोडकर, वासुदेव कुडे उमेश आखाडे, पांडुरंग नागापुरे, घनश्याम जकुलवार यांच्यासह अनेकांचा सहभाग होता.

## वाहन चालकांवर कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ५९५ वाहन चालकांवर कारवाई करून ३,५६,८०० रुपयांचा दंड वसूल केला.

त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारू बंदी कायद्यान्वये १२ व एनडीपीएस अन्वये ३ अशा एकूण १५ प्रकरणात १६ आरोपींवर कारवाई करून २९,२६३ रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ६ प्रकरणात १४ आरोपींवर कारवाई करून २,५४,९१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.

## सर्व्हिस रोडला तलावाचे स्वरूप

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा, दि. ३ :**
अमरावती रोड ते समृद्धी महामार्ग एन्ट्री पॉईंट ला जोडणाऱ्या हिंगण्याच्या बाह्यवळण मार्गाच्या कवडस मार्गावरून या चारपदरी मार्गावर चढण्यासाठी वाहनचालक या सर्व्हिस मार्गाचा वापर करतात.

या सर्व्हिस रस्त्यावर मात्र पावसाळ्यात दोन-तीन फूट खोलीचे दहा बारा ठिकाणी मोठमोठे तलावंच साचले आहे. छोट्या कार, आटो, रिक्षा या मार्गाने जाऊच शकत नाही अशी परिस्थिती असताना याकडे कुणाचेही लक्ष नाही. या ठिकाणापासून तीन किमी अंतरावर टोल नाका सुरु आहे.वाहनचालकांकडून टोल घेऊनही सर्व्हिस रस्ते दुरुस्ती कडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत



## मराठा आरक्षणावर वकील सदावर्ते यांचे थेट ओपन चॅलेंज



■ **मुंबई :** मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने काढलेल्या जीआरवर आता वकील गुणरत्न सदावर्ते यांनी थेट हल्लाबोल केला आहे. सदावर्तेंच्या म्हणण्यानुसार, हा शासन निर्णय बेकायदेशीर आहे आणि संविधानाच्या मर्यादांचा भंग करतो.

सदावर्ते म्हणाले की, मंत्रिमंडळ बैठकीत छगन भुजबळ यांनी उपस्थिती न दाखवून लोकतांत्रिक मार्गाने सरकारला संविधानिक सल्ला दिला. मात्र, राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासन निर्णय जातिवादी आधारावर घेतल्याचा आरोप त्यांनी केला. कुणबी आणि मराठा वेगळे आहेत, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. जर सरकारच्या निर्णयाने समाजाची फसवणूक झाली, तर याचे जबाबदार कोण? असा प्रश्न सदावर्तेंनी उपस्थित केला.

सदावर्ते यांनी उघडपणे फडणवीस सरकारमधील विखे पाटील यांना चॅलेंज दिले की, त्यांनी पोलिसांना मारहाण झालेल्या गुन्ह्यांबाबत ठोस कृती करावी आणि आरक्षणाच्या मुद्द्यावर शासनाने केलेले संविधानविरुद्ध निर्णय मागे घ्यावा. त्यांनी म्हणाले की, जरांग्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी समाजाला फसवले आहे आणि शिंदे कमिटी बेकायदेशीर आहे. त्याचबरोबर, सदावर्ते यांनी धनंजय मुंडे, बावनकुळे आणि इतर मंत्र्यांच्या भूमिकांवर टीका करत, मराठा समाजाच्या हितासाठी ठोस आणि पारदर्शक निर्णय घेण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

## सरकारच्या जीआरवर प्रश्नचिन्ह

■ **मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांच्या पाच दिवसांच्या उपोषणानंतर सरकारने हैद्राबाद गॅझेट लागू करण्यासाठी जीआर काढला. मराठा आंदोलनकर्त्यांनी याचा आनंदोत्सव साजरा केला, पण माजी न्यायाधीश बी.जी. कोळसे-पाटील यांचा दृष्टिकोन अत्यंत गंभीर आहे. कोळसे-पाटील म्हणाले की, हे आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकणार नाही. जीआर पाहून मी स्वतः हतबल झालो.ह्व त्यांनी जरांगे पाटीलांना फोन करूनही चेतावणी दिली होती की, या निर्णयातून मराठ्यांचे आणि त्यांच्या तब्येतीचे नुकसान होऊ शकते.

माजी न्यायाधीश म्हणाले की, या जीआरचा संपूर्ण अंमलबजावणीचा मजकूर पाहिला तर तलाठ्यापासून ग्रामपंचायत अधिकारी, कृषी सहायक अधिकारी यांच्याकडे जावे लागेल, आणि शेवटी कोटार्तील प्रक्रिया टाळता येणार नाही. जर कायदेशीर आरक्षण द्यायचे असेल, तर ते केंद्र आणि राज्य सरकार मिळूनच करावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कोळसे-पाटील यांनी उपोषणातून मिळालेल्या वचनांची खरी किंमत कायदेशीर चौकटीत तपासून ठरवण्याचे आव्हान दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार, मी १९७६ पासून मरण, पोलिस आणि तुरुंग यांना न घाबरत, १०० टक्के सत्य बोलून टिकेचा धनी व्हायला तयार आहे. डोंगर पोखरून उंदीर बाहेर काढणे म्हणजे काय हे आता मला समजले. यामुळे मराठा आरक्षणाच्या भवितव्यासाठी सामाजिक आणि राजकीय चर्चेलानवीन तडा लागला आहे. आंदोलनातील आनंदोत्सव आणि मिळालेल्या जीआरच्या प्रभावाची खरी प्रत्यक्षता आता न्यायालयीन कसोटीवर पडणार आहे.

## जीआरचा किती फायदा होणार?



■ **मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मराठा आरक्षणाशी संबंधित काल काढलेल्या जीआरमुळे किती फायदा होईल याविषयी साशंकता आहे, असे मत आमदार रोहित पवार यांनी बुधवारी व्यक्त केले. मनोज जरांगे यांचे आंदोलन गतवर्षी नवी मुंबईत थांबवण्यात आले होते. तेव्हा एक अध्यादेश देण्यात आला होता. तो अध्यादेश व कालचा जीआर याच्यात नाव व थोड्याफार गोष्टी बदलल्या तर काहीच फरक नाही, असेही ते यावेळी म्हणालेत. रोहित पवार यांच्या भूमिकेमुळे मराठा आरक्षणाचा निकालेली निघालेला कथित मुद्दा आणखी तापण्याची चिन्हे आहेत.

ते म्हणाले, मनोज जरांगे यांचे आंदोलन होणार हे ३ महिन्यांपूर्वीच सरकारला कळले होते. पण या ३ महिन्यांत मंत्रिमंडळाच्या उपसमितीने एकही बैठक घेतली नाही. याविषयी कोणतीही चर्चा केली नाही. मग हा विलंब का केला गेला? विदर्भासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून किती जण येणार आहेत? याचा अंदाज राज्याच्या गृह खात्याकडे होता. पण त्यानंतरही मुंबई महापालिकेला याबाबतीत कुठेही सांगण्यात आले नव्हते. किती मोठ्या प्रमाणात लोकं येणार आहेत याचा कोणताही अंदाज महापालिकेला नव्हता. सरकार या नियोजनाच्या बाबतीत कमी पडले असे आमचे मत आहे.

## मराठा आरक्षणा संदर्भातील जीआरवर

# ओबीसी नेत्यांमध्ये मतभेद

### भुजबळ, हाके, तायवाडे यांच्या परस्परविरोधी भूमिका : तिघांतही एकवाक्यतेचा अभाव

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** मनोज जरांगे यांच्या मुंबईतील बेमुदत उपोषणाची मंगळवारी यशस्वी सांगता झाली. मराठा समाजाला कुणबीच्या माध्यमातून ओबीसी आरक्षण देण्यासाठी महायुती सरकारने एक महत्वपूर्ण जीआर काढला. या जीआरवर आता राजकीय वतुर्ळातून विशेषतः ओबीसी नेत्यांतून वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत.

ओबीसींचे राज्यातील बडे नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी या प्रकरणी कायदेशीर सल्ला घेऊन कोर्टात जाण्याचा इशारा दिला आहे. लक्ष्मण हाके यांनीही हा जीआर फाडला आहे. याऊलट बबनराव तायवाडे यांनी या जीआरमुळे ओबीसींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचा दावा करत या दोघांना झटका दिला आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावर ओबीसी नेत्यांतच टोकाचे मतभेद असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**छगन भुजबळांची भूमिका**

मराठा आरक्षणाच्या मुद्यावर राज्य सरकारने काढलेल्या जीआरवर छगन भुजबळ यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. ते या प्रकरणी चांगलेच नाराज झालेत. त्यांनी या प्रकरणी आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीवरही बहिष्कार टाकला. त्यामुळे त्यांची मनधरणी करण्यासाठी सरकार व सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात मोठी धावपळ सुरू झाली आहे. सरकारने या प्रकरणी ओबीसी समासाठी मंत्रिमंडळाची उपसमितीही स्थापन केली आहे. या समितीच्या माध्यमातून ओबीसी समाजाच्या







उत्थानाचा कार्यक्रम आखण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

छगन भुजबळ या प्रकरणी बोलताना म्हणाले की, राज्य सरकारने काढलेल्या अधिसूचनेबाबत आमच्या मनात, ओबीसी नेत्यांच्या मनात व जनतेच्या मनात फार मोठ्या शका आहेत.

आम्ही यावर वकिलांचा कायदेशीर सल्ला घेत आहोत. सरकारला एखाद्या जातीला उचलून दुसऱ्या जातीत टाकण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे आम्ही या प्रकरणी न्यायालयात दाद मागणार आहोत. कायदेशीर लढाई लढणार आहोत. भुजबळांच्या या विधानानंतर मराठा आरक्षणाच्या जीआरला कोर्टात आव्हान मिळेल हे स्पष्ट आहे.

**लक्ष्मण हाकेंनी फाडला जीआर**

दुसरीकडे, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सरकारचा जीआर फाडून आपला रोष व्यक्त केला आहे. सरकारने मनोज जरांगे यांचे उपोषण सोडवताना जाहीर केलेला अध्यादेश पूर्णतः बेकायदा आहे.

गावगाड्यातील ओबीसी साज तसेच अन्य प्रवर्गातील जाती-जमातींमधील सर्वांच्याच आरक्षणाचा घोट या सरकारी अध्यादेशाने घेतला आहे. सरकार या अध्यादेशामुळे ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागला नसल्याचा दावा करत आहे. पण हा धक्का कसा लागत नाही? हे सरकारने सिद्ध करून दाखवावे. मराठा समाजाला जात प्रमाणपत्र मिळण्याच्या कामात सुलभता यावी यासाठी हा अध्यादेश आहे असे त्यात म्हटले आहे. त्याचा अर्थ काय? हे सरकारने महाराष्ट्राला समजून सांगावे, असे हाके म्हणाले.

मराठा आरक्षणाच्या उपसमितीत ओबीसी समाजाची सर्वांगिन माहिती असणारा एकही माणूस नव्हता. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचाही या विषयाचा कोणता अभ्यास नाही. राज्यातील ओबीसी समाजाची विस्ताराने माहिती असणारे या समितीत कुणीही नाही. त्यामुळे ही समितीच पक्षपाती आहे. गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना म्हणजेच सग्यासोयऱ्यांना सरसकट आरक्षण आहे असा होतो. सरकारने ओबीसी आरक्षण संपवले आहे, असेही लक्ष्मण हाके याविषयी आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.

**प्रकाश शेंडगेंची अनुकूल भूमिका**

अन्य एक ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे ओबीसी समाजावर अन्याय झाल्याचा आरोप केला आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे छगन भुजबळ नाराज झालेत. सरकारने मराठा समाजाला ओबीसींच्या ताटातले आरक्षण दिले आहे. त्याला आमचा विरोध आहे. आम्ही या प्रकरणी राज्यव्यापी आंदोलन उभारू. याविषयी हैदराबाद गॅझेटियरमध्ये ज्या बाबी नोंद आहेत, त्यावरही आमचा आक्षेप आहे. आता आम्ही याविषयी कायदेशीर लढाई लढू. ओबीसी समाज हा राज्यातील सर्वांत मोठा समाज आहे. त्यावर अन्याय होता कामा नये, असे ते म्हणालेत.

बबनराव तायवाडे म्हणतात - ओबीसींचे कोणतेही नुकसान नाही

उल्लेखनीय बाब म्हणजे ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी छगन भुजबळ व लक्ष्मण हाके या दोघांहून अत्यंत वेगळी भूमिका घेतली आहे. त्यांनी या प्रकरणी ओबीसी समाजाचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचा दावा केला आहे. आम्ही सरकारच्या जीआरवर समाधानी आहोत. आम्ही या जीआरचा अभ्यास केला. त्यावर चिंतन - मनन केले. या अध्यादेशामुळे ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागला नाही. हा शासननिर्णय सरसकट कुणबी जातप्रमाणपत्र निर्गमित करण्याचा नाही. कारण, ज्या कुण्या व्यक्तीला कुणबी, मराठा - कुणबी व कुणबी - मराठा जातप्रमाणपत्र हवी आहेत, त्या व्यक्तीलाही सध्याच्या प्रचलित पद्धतीतून जावे लागणार आहे. विशेषतः हैदराबाद गॅझेटियरमध्ये वैयक्तिक नोंदी नाहीत. यावर्षी एवढे कुणबी होते, त्यावर्षी एवढे मराठे होते एवढीच आकडेवारी त्यात आहे. त्या आधारावर काहीच सिद्ध होत नाही, असे ते म्हणालेत.

## मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात

# अडचणी येणार नाहीत

### आरक्षणाच्या जीआरवर एकनाथ शिंदेंची प्रतिक्रिया

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** मराठा समाजाला आरक्षण मिळवे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत उपोषण सुरू केले होते. ५ दिवसांच्या उपोषणानंतर अखेर राज्य सरकारने जरांगेंच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाने जीआर देखील काढला आहे.

परंतु, या जीआरला ओबीसी नेत्यांनी विरोध केला असल्याचे दिसत आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी देखील या जीआरच्या निषेधार्थ आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकला होता. या सगळ्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर आपल्या सरकारने काढला आहे. याबद्दल सविस्तर मी बोललो आहे तसेच मुख्यमंत्री सुद्धा बोलले आहेत. यामध्ये जो निर्णय आम्ही घेतला आहे तो कायद्याच्या चौकटीत बसवून घेतला आहे. त्यामुळे जी काही पद्धत आहे.

मराठा समाजातल्या कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात जी प्रक्रिया आहे ती अधिक सोपी करणे सुलभ करणे याचा उल्लेख जीआरमध्ये स्पष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे मला असे वाटते की त्याची अंमलबजावणी करण्यात कुठलीही अडचण येणार नाही आणि कुणबी प्रमाणपत्र मराठा समाजाला मिळेल.

**भुजबळांची नाराजी दूर होईल**

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, हे सगळे करत असताना ओबीसी समाजाचे कुठलेही नुकसान होणार नाही, अशी भूमिका सरकारची सुरुवातीपासून आहे. छगन भुजबळ यांच्याशी आम्ही बोलू, मुख्यमंत्री देखील बोलतील आणि जो काही निर्णय घेण्यात आला आहे, त्याची जी काही वस्तुस्थिती आहे त्यांना समजाऊन सांगू.



मला वाटते आपण जो काही निर्णय घेतलेला आहे त्याची माहिती आणि वस्तुस्थिती समजून घेतल्यानंतर भुजबळ साहेबांची नाराजी दूर होईल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

**भुजबळ कॅबिनेट बैठकीला गैरहजर**

छगन भुजबळ हे मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे नाराज झाल्याने त्यांनी आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकल्याची चर्चा आहे. मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी झालेल्या पक्षाच्या बैठकीला छगन भुजबळ उपस्थित होते. मात्र कॅबिनेट बैठकीला हजर नसल्याचे चर्चांना उधाण आले आहे. त्यांनी याबाबत बोलण्यास नकार दिला. मात्र मराठा आरक्षणाच्या जीआरला त्यांचा विरोध असून ते त्याविरोधात कोर्टात जाणार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच मला वाटत आहे की काही लोक म्हणत होते की हरकती मागवायला हव्या होत्या.काही लोक म्हणतात की ते यांना अधिकार आहे का? आता पाहू ते सगळ आता आम्ही विचार करतो. असा निर्णय होईल अशी आम्हाला काय कुणालाच अपेक्षा नव्हती, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

# शिंदे गटाच्या कार्यकर्त्याची कारखाली चिरडून हत्या

### ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरातील घटना : जनता भयभीत : व्हिडिओ व्हायरल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या एका कार्यकर्त्याची ठाण्यातील वागळे इस्टेट येथील आयटी सर्कल येथे कारखाली चिरडू हत्या करण्यात आल्याची भयंकर घटना रात्री उशिरा घडली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, यामुळे जनतेत दहशत पसरली आहे.

विठ्ठल गायकर असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तो शिवसेनेचा स्थानिक कार्यकर्ता होता. त्यांची संतोष पवार नामक आरोपीने कारखाली चिरडून निर्घृण हत्या केली. घटनेनंतर आरोपी संतोष पवार कारसह फरार झाला. पण श्रीनगर पोलिसांनी तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेत आरोपीची कार जप्त केली. पोलिसांनी आरोपीच्या एका सहकाऱ्यालाही अटक केली आहे. श्रीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गुलजारीलाल फडतरे यांनी या घटनेविषयी सांगितले की, आरोपीच्या शोधासाठी ३ विशेष पथके स्थापन करण्यात आली आहे.

**घटनेचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल**

दुसरीकडे, घटनेचे एक सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियात व्हायरल झाले आहे. त्यात गुंड संतोष पवार हा विठ्ठल गायकर यांना कारखाली चिरडून ठार मारताना दिसत आहे. प्रथम तो गायकर यांना कारने धडक देतो. त्यानंतर ते खाली पडल्यानंतर कार त्यांच्या छाती व डोक्यावर घालतो. आरोपी संतोष पवारवर यापूर्वीसुद्धा अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. हे हत्याकांड पूर्ववैमनस्यातून घडल्याचेही सांगण्यात येत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे या घटनेनंतर ठाण्यातील गुन्हेगारी स्वरुप व त्यातील नवनवीन पॅटर्नकडे लक्ष वेधले गेले आहे. गुंड आता पूर्वीप्रमाणे शस्त्राने नव्हे तर गाडीखाली चिरडून ठार मारताना दिसून येत आहेत. पोलिसांपुढे आरोपीच्या मुसक्या आवळण्याचे मोठे आव्हान आहे.

**पोलिसांनी उधळला हल्ल्याचा कट**

दुसरीकडे, पुणे पोलिसंनी वनराज आंदेकरच्या हत्येचा बदला घेण्याचा एक प्रयत्न उधळवून लावला आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची गतवर्षी हत्या करण्यात आली होती. त्यांच्या हत्येला १ वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने विरोधी टोळीने बदला घेण्याचा कट आखला होता.

त्यानुसार, वनराज आंदेकर यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सोमनाथ गायकवाडच्या मुलावर कात्रज भागात रविवारी मध्यरात्री हल्ला करण्याची योजना होती. पण तत्पूर्वीच या कटात सहभागी असणाऱ्या एका आरोपीला अटक करण्यात आली. यामुळे हा कट उधळला गेला. या प्रकरणी समर्थ नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मैत्रिणीला छेडल्याने खून

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. ३ :** त्र्यंबकनाक्यावरील फूटपाथवरच मैत्रिणीची छेड काढल्याच्या संशयावरून फिरस्त्या युवकाच्या डोक्यावरच पेव्हर ब्लॉकने मारून खून केल्याची धक्कादायक घटना घडली.

ठक्कर बसस्थानकाच्या मागील बाजूस माझदा हॉटेलच्या समोर फुटपाथवर दोन युवक एक मैत्रिणीसोबत फिरत असताना त्यांनी फिरस्ता युवकाला रस्त्यातच मारहाण सुरू केली. फिरस्त्याला खाली पाडून त्याच्या डोक्यात जवळील पेव्हर ब्लॉक उचलून दोन-तीन वेळा मारून जागेवरच रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडेपर्यंत मारले. पोलिसांनी तीनयुवक आणि युवती पळून जाताना पाठलाग करून त्यांना पकडले. चौकशीत संशयित जयेश रायबहादूर याने मैत्रिणीला छेडल्याच्या कारणातून खून केल्याची कबुली दिली.

# गुन्ह्यांचा सिलसिला सुरूच!

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. ३ :** राज्यातील राजकीय व सामाजिक गल्लीवर मराठा आंदोलनाचा उद्रेक अद्याप गाजतोय. मुंबईतील हजारों मराठा बांधवांनी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानावर जमले आणि अनेक दिवसांचा उपोषण संपवल्यानंतरच माघारी फिरले.

उच्च न्यायालयात आंदोलनावर सुनावणी पूर्ण झाली असून, न्यायालयाने सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याचे स्पष्ट केले. आंदोलकांच्या वकिलांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मरीन ड्राईव्ह आणि डोंगरी पोलीस ठाण्यात आंदोलनकर्त्यांविरोधात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, आत्तापर्यंत ९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

ज्यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडले, तेव्हा हजारोंच्या संख्येने जमलेल्या मराठा बांधवांनी शांततेने आपापल्या घराकडे माघारी निघाले. तथापि, आझाद मैदान, एमआरए मार्ग, लोकमान्य टिळक मार्ग, डोंगरी आणि पायधुनी या पोलीस ठाण्यांमध्ये आंदोलनादरम्यान झालेल्या गैरकायद्यांच्या घटनांबाबत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सरकारकडून बहुतेक मागण्या मान्य झाल्यानंतरही, आंदोलनाच्या विरोधातील कायदेशीर कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत आहेत. न्यायालयीन सुनावणी आणि गुन्ह्यांच्या नोंदींनी मराठा आंदोलनाच्या भवितव्यासाठी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

**धक्कादायक निर्णय!**

मंत्रिमंडळाच्या ताज्या बैठकीने राज्यात राजकीय वाऱ्याला नवे वळण दिले आहे. अचानक चर्चेत आलेल्या निर्णयाने सर्वच पक्षांमध्ये चर्चा आणि गोंधळ निर्माण झाला आहे. राजकीय विश्लेषक म्हणतात की, हा निर्णय काही काळासाठी वादविवादाचे केंद्र बनेल.

सत्ताधारी गटातील मंत्र्यांमध्ये सुसंगती तपासण्यासाठी, आणि ओबीसी समुदायाशी संबंधित मुद्यांवर प्रभावी मार्ग शोधण्यासाठी खास उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. ही उपसमिती फक्त चर्चा करण्यापुरती मर्यादित न राहता, पुढील धोरणात्मक निर्णयांवर देखील प्रभाव टाकणार आहे. उपसमितीत प्रत्येक पक्षातून दोन-२ मंत्री आणि अधिकारी सामील असणार आहेत, एकूण सहा जणांनी ही कार्यसंघ रचना पूर्ण केली आहे. या उपसमितीच्या बैठकीतून पुढील आठवड्यात राज्यातील ओबीसी आरक्षण आणि विकास धोरणांसाठी ठोस प्रस्ताव समोर येण्याची शक्यता आहे.

मात्र, कायदे आणि समाजातील तज्ज्ञांच्या मते, या निर्णयामुळे आंदोलनकर्त्यांच्या अपेक्षा आणि प्रशासनाच्या धोरणामध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या उपसमितीच्या पहिल्या बैठकीकडे सर्वच वर्गांचे लक्ष लागले आहे. म्हणूनच, मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेला हा निर्णय ओबीसीसाठी उपसमिती स्थापन करण्याचा, राज्यातील राजकीय परिस्थितीवर मोठा प्रभाव टाकणार असल्याचे दिसत आहे.

**सरकारच्या निर्णयाची खरी कथा**

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाने मराठा समाजातच नव्हे, तर राजकीय गल्लीतही तुफान चर्चा उडवली. मराठा आणि कुणबी एकच आहेत, त्यांचा ओबीसी आरक्षणात समावेश व्हावा अशी मागणी त्यांनी ठामपणे मांडली.

सरकारने त्वरित जीआर जाहीर करून हैद्राबाद गॅझेटिअरला मान्यता दिली; पण सातारा संस्थानाची प्रतिक्षा पुढील महिन्यापर्यंत ठेवल्याने आंदोलन मागे घेण्यास मनोज जरांगे मजबूर झाले. मात्र, विधीज्ञ असीम सरोदे यांच्या मते, सगळं आधीच ठरलेलं होतं आणि मनोजदादांना अपेक्षित निकाल अजूनही मिळालेला नाही. निकटवतीयांकडून आलेल्या मेसेजसाठी सरोदे यांनी सल्ला दिला.

सरकारच्या जीआर मध्ये मोफत शिक्षण आणि नोकरीची हमी असली तरी, प्रक्रिया अस्पष्ट आणि क्लिष्ट भाषेत असल्याने आंदोलनकर्त्यांना फसवले जाण्याचा धोका आहे. सरोदे म्हणतात की, आरक्षण हा एकमेव विकासाचा मार्ग नाही. शिक्षण, रोजगार आणि दर्जेदार सुविधा याकडे लक्ष द्यायला हवे. सरोदे यांनी सुचवले की, कुणबी-मराठा नोंद नसलेल्या कुटुंबांसाठी केंद्र सरकारकडे अतिरिक्त मागणी करणे आवश्यक होते. तसेच, मुख्यमंत्री यांनी पंतप्रधान आणि केंद्र सरकारला पत्र देऊन जरांगे यांना प्रत द्यावी, तर विश्वासार्हता वाढली असती, असे अॅड. असिम सरोदे यांनी म्हटले आहे.

# आंदोलनामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई कोण देणार?

### हायकोर्टाचा मनोज जरांगेंना सवाल : चार आठवड्यांत स्पष्टीकरण देण्याचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :** मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनामुळे मुंबईतील सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना चार आठवड्यांच्या आत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

या नुकसानीची भरपाई कोण देणार? अशी विचारणाही मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना केली. याबाबत चार आठवड्यांत प्रतिज्ञापत्रात स्पष्टीकरण देण्याचे निर्देश मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना दिले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसले होते. मनोज जरांगे यांच्या एका हाकेवर राज्यभरातील मराठा बांधव मुंबईत दाखल झाले होते. सरकारच्या मध्यस्थीने मंगळवारी मनोज जरांगे यांचे उपोषण संपले. मात्र, या आंदोलनादरम्यान मुंबईत सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान झाले असल्याच्या पार्श्वभूमीवर त्याची भरपाई कोणाकडून करायची, हा प्रश्न उच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. बुधवारी प्रभारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठासमोर याचिकेची सुनावणी झाली.



**हायकोर्टात नेमके काय घडले?**

उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, जरांगे यांनी प्रक्षोभक भाषणे दिल्याने मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईत आले आणि त्यामुळे मालमत्तेचे नुकसान झाले. परंतु, जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी हे आरोप फेटाळले. त्यांनी सांगितले की, जरांगे यांनी असे कोणतेही भाषण दिले नाही आणि आंदोलकांनी रस्ते किंवा फूटपाथ अडवण्याशिवाय दुसरे कोणतेही नुकसान केले नाही. मात्र, न्यायालयाने काही फोटो दाखवले ज्यात नुकसान झाल्याचे दिसत होते.

तसेच, समन्वयाचा अभाव किंवा अन्य कारणामुळे हे सगळे घडले असावे. परंतु, नुकसान झाल्याचे छायाचित्रांतून दिसत आहे याचा पुनरूच्चार न्यायालयाने केला. तेव्हा आंदोलकांनी सार्वजनिक मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान केले नसल्याचे जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी पुन्हा एकदा न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला.

हे प्रकरण आता निकाली निघाले असले तरी, नुकसानीच्या भरपाईचा मुद्दा बाकी आहे. त्यामुळे, कोणतीही तोंडी माहिती न देता, जरांगे आणि आयोजकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे आपली बाजू मांडावी. यानंतरच याचिका निकाली काढली जाईल, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

यापूर्वी, सरकारने आंदोलनादरम्यान झालेल्या नुकसानीची भरपाई पोलिसांमार्फत वसूल केली जाईल असे सांगितले होते. मात्र, न्यायालयाने ही माहिती पुरेशी नसल्याचे म्हटले आणि लेखी स्वरूपात स्पष्टीकरण देण्यास सांगितले. दरम्यान, न्यायालयानेआझाद मैदान तातडीने रिकामे करण्याचा इशाराही सोमवारी दिला होता.

# फायनल फाइट... लढा यशस्वी?

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून लढा सुरू होता. मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण करत या लढ्याला वेगळे वळण दिले. या पूर्वी देखील मनोज जरांगे यांनी अनेकवेळा आंदोलन केले, मोर्चे काढले होते. मात्र, आरक्षण काही मिळत नव्हते. अखेर आता शेवटची लढाई म्हणत मनोज जरांगे यांनी २७ ऑगस्ट रोजी त्यांनी हजारो समर्थकांसह मुंबईच्या दिशेने कूच करण्यास सुरुवात केली.

------------------

मनोज जरांगे यांनी मुंबईची वाट धरली आणि टप्प्या-टप्प्यावर हजारोंच्या संख्येने असलेले मराठा बांधव लाखोंच्या संख्येत वाढत गेले. मुंबईमध्ये दाखल होण्यापूर्वी मनोज जरांगे यांनी शिवसेनरीला भेट दिली. महायुती सरकारकडून मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी हालचाली तोपर्यंत वाढल्या होत्या आणि त्यानुसार मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष बनवले आणि मंत्र्यांच्या बैठकांना सुरुवात झाली.

### जरांगे मुंबईत धडकले

मनोज जरांगे यांनी मुंबईत आंदोलन करू नये म्हणून अनेकांनी प्रयत्न केले. त्यात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका देखील दाखल केली होती. त्यानुसार मुंबईच्या दिशेने असतानाच मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला परवानगी नाकारली.

असा निर्णय आलेला असताना देखील मनोज जरांगे यांची मुंबईच्या दिशेने कूच सुरूच राहिली. त्यानंतर मुंबई पोलिसांनी मराठा आंदोलकांसाठी मुंबईत येण्यासाठी एक रस्ता निश्चित केला. आणि अखेर २९ ऑगस्ट रोजी मनोज जरांगे मुंबईच्या आझाद मैदानात पोहोचले. यावेळी संपूर्ण राज्यातून मराठा समाज हा मुंबईत दाखल झाला होता.

### मुंबईत जिकडे तिकडे मराठेच

आंदोलनाला सुरुवात झाली आणि मुंबईत सगळीकडे मराठा बांधवांची गर्दी पाहायला मिळाली. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर मराठ्यांनी ठाण मांडला. आझाद मैदान देखील मराठा बांधवांनी भरून गेले. उपोषणाला बसल्यावर मनोज जरांगे यांनी सर्व आंदोलकांना शांतता राखण्याचे आवाहन केले तसेच यावेळी भाषणात त्यांनी महायुती सरकारवर विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

### एकतर विजयी यात्रा नाहीतर अंत्ययात्रा..

मनोज जरांगे यांनी उपोषणाला सुरुवात केली आणि दुस?्या दिवशी त्यांची प्रकृती थोडी खालावली. तसेच मराठा आंदोलकांची मुंबईत गैरसोय होत असल्याचे त्यांना समजले व त्यांनी सायंकाळी भाषण करताना मराठा बांधवांना त्रास देऊ नका तसेच अन्न-पाण्याची सोय करण्यात यावी अशी सरकारकडे विनंती केली.

त्यानंतर राज्यभरातून गावागावातून मुंबईतील मराठा आंदोलकांसाठी जेवण पाठवण्यास सुरुवात झाली. तसेच सरकारकडून केवळ बैठकाच सुरू असल्याने मनोज जरांगे यांनी भाषणात महायुतीवर टीका केली. आता ही शेवटची लढाई आहे, आता एकत्र आपली विजयी यात्रा निघेल, नाहीतर माझी अंत्ययात्रा निघेल, असा निर्धारच मनोज जरांगे यांनी बोलून दाखवला.

### उच्च न्यायालयाने घेतली कठोर भूमिका

मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या मुद्यावर अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. कोटार्ने आज दुपारी या प्रकरणी झालेल्या संक्षिप्त सुनावणीत मुंबईत जे काही सुरू आहे ते पूर्णतः बेकायदा सुरू असल्याचे स्पष्ट केले. राज्य सरकारने दुपारी ४ वाजेपर्यंत सर्वकाही सुरळीत केले नाही, तर कोर्ट या प्रकरणी अत्यंत कठोर भूमिका घेईल, असे कोर्टाने म्हटले होते.

उच्च न्यायालयाने मराठा आंदोलकांनी नियम मोडल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलकांना केवळ आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी होती, मात्र त्यांनी या नियमाचे उल्लंघन केले, असे न्यायालयाने नमूद केले. तसेच तुम्ही अजूनही आझाद मैदान व आसपासचा परिसर रिक्त का करू शकला नाहीत? आंदोलकांना तिथून हटवण्यासाठी तुम्हाला जरांगे यांचीच मदत का घ्यावी लागतेय? असे प्रश्न उपस्थित करत उच्च न्यायालयाने राज्य सरकारलाही खडेबोल सुनावले. यानंतर सुनावणी दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली होती.



### विखे पाटील आझाद मैदानात

मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असतानाच इकडे सरकारच्यावतीने शिष्टमंडळ मसुदा घेऊन मनोज जरांगे यांना दाखवण्यासाठी निघाले. उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले तसेच मंत्री उदय सामंत यांनी मनोज जरांगे यांची भेट घेत त्यांना मसुदा दाखवला.

यावेळी मनोज जरांगे यांनी त्यांच्या वकिलांच्या टीमच्या मार्फत मसुदा वाचन केले. त्यानंतर फक्त मसुदा नको तर जीआर पाहिजे, अशी मागणी केली. त्यानुसार राधाकृष्ण विखे पाटलांनी एक तासात जीआर येणार असे आश्वासन दिले.

राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी सगेसोयरेच्या अध्यादेशावर ८ लाख हरकती आल्याचे जरांगे यांना सांगितले. यावेळी मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी जरांगेंना सातारा गॅझेट लागू करण्याची ग्वाही दिली. त्यानंतर जरांगेंनी यासाठी सरकारला १ महिन्याचा वेळ देण्याची तयारी दर्शवली.

### हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय

मंत्री विखे पाटील यांनी यावेळी मनोज जरांगे यांना सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती दिली. जरांगे याविषयी बोलताना सांगितले, सरकारने हैदराबाद गॅझेटियरची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे.

सातारा संस्थानच्या गॅझेटियरमध्ये पश्चिम महाराष्ट्र संपूर्ण बसतो. सातारा गॅझेटियर तथा पुणे व औंध गॅझेटियरची अंमलबजावणी करण्याच्या मुद्यावर कायदेशीर बाबी तपासून जलदगतीने निर्णय घेण्यात येईल असे सरकारने सांगितले आहे. या प्रकरणी २-३ मुद्यांवर कायदेशीर त्रुटी आहेत. पण सरकारने त्यावरही १५ दिवसांत योग्य ती कारवाई करण्याची ग्वाही दिली आहे.

### सरकारला २ महिन्यांची मुदत

मनोज जरांगे यांनी यावेळी मराठा व कुणबी एकच असल्याच्या मुद्यावर सरकारला २ महिन्यांची मुदत देण्याची घोषणा केली. ते म्हणाले, आम्ही सरकारकडे ५८ लाख नोंदींच्या आधारावर मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढण्याची मागणी केली होती.

त्यावर सरकारने हा मुद्दा क्लिष्ट असल्यामुळे त्यावर निर्णय घेण्यासाठी महिन्याभराची मुदत मागितली होती. मी त्यांना दीड महिन्यांची मुदत दिली. पण विखे पाटलांचा हात थोड जड आहे. त्यांनी २ महिन्यांचा वेळ मागितला. त्यानुसार आम्ही त्यांना ही मुदत दिली. या मुदतीनंतर मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढला जाईल.

### जीआर की राजकीय खेळी?

मराठा आरक्षणावरून राज्यात पुन्हा राजकीय चक्रावणं सुरू झालंय. सरकारने मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार हैदराबाद गॅझेट अंमलबजावणीचा जीआर काढला. त्याचबरोबर आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे, मृतांच्या कुटुंबीयांना मदत व नोकरी यांसारख्या घोषणा करण्यात आल्या. पण हा जीआर खरंच मराठा समाजाला दिलासा देणारा आहे का, यावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

मराठा आरक्षणासाठी न्यायालयीन लढा देणारे आणि आंदोलक नेते विनोद पाटील यांनी थेट सरकारला आणि उपसमिती अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांना आव्हान दिलं आहे. हा जीआर समाजाला टाचणीएवढाही फायदा देणार नाही. छाती ठोकून सांगतो, यातून एकाचंही सर्टिफिकेट निघणार नाही. विखेंनी पत्रकार परिषद घेऊन याचा अर्थ स्पष्ट करावा, असा त्यांचा टोला.

विनोद पाटील इथवरच थांबले नाहीत. त्यांनी सरकारच्या या निर्णयाला थेट १०० पैकी मायनस झिरो मार्कद्ध दिले. शिंदे सरकारने गेल्यावेळी गुलाल खेळला, त्याचं उत्तर आजवर मिळालं नाही. आता विखेंनी गुलाल खेळला आहे, त्यांनी तरी उत्तर द्यावं, असं ते म्हणाले.

मनोज जरांगे यांची मुंबईवरची धडक, आंदोलकांच्या गर्दीमुळे मुंबईची झालेली तुंबई आणि त्यातच सरकारची झालेली गोची पाहता यातून सूटका करण्यासाठी राज्य सरकारने तडकाफडकी काही जीआर काढले खरे. परंतु, कायद्याच्या कसोटीत ते टिकणार का? मराठा समाजात अपेक्षेचं वातावरण असताना या नव्या घडामोडींनी गोंधळ उडवला आहे. सरकारची ही घोषणा केवळ राजकीय खेळी आहे का, की खरंच यातून आरक्षणाचा मार्ग सुटेल? विखेंचं उत्तर आता सर्वांच्या प्रतीक्षेत आहे.

# ओबीसींच्या हक्कांची खरी लढाई आता सुरु

कुणबी आरक्षणाची आकस्मिक वापर होऊ लागले आहे. मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळवून देण्याची ही प्रक्रिया अस्वीकार्य आहे. त्यामुळे कुणबींच्या आरक्षणावर अतिक्रमण होऊ शकते. मनोज जरांगे यांचे उपोषण संपले आणि सरकारने हैदराबाद गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला पण केवळ व्यक्तिगत तपासणीनंतरच लाभ मिळेल. सरसकट आरक्षणाची मागणी मान्य होणार नाही.



अरूण सोपानराव कराळे
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

ओबीसी आरक्षणात मराठ्यांचा प्रवेश होणार असल्यामुळे कुणबी समुदायाला संभाव्य नुकसान सोसावे लागणार आहे. यामुळे ओबीसी आरक्षणात मराठ्यांची प्रवेश प्रक्रिया आणि प्रमाणपत्र प्रणाली वाढण्याची आशंका, आणि ओबीसी संघटनांचा ठाम विरोध, आंदोलन सुरूच राहणार आहे.

ओबीसी समाज हा देशातील सर्वात मोठा घटक असूनही त्यांच्यावर सातत्याने अन्याय होत आला आहे. राजकीय नेते, संघटना आणि माध्यमे याबाबत मौन धारण करून राहतात, तर काही जण मुद्दाम गोंधळ निर्माण करून समाजाचे लक्ष भरकटवतात. म्हणूनच आज ओबीसींच्या हक्कांसाठी स्पष्ट भूमिका घेण्याची आणि एकत्रितपणे लढण्याची गरज आहे.

### आंदोलनाचे मुख्य मुद्दे

ओबीसींवर होणारा अन्याय उघड करण्यासाठी आणि समाजाला जागृत करण्यासाठी काही ठोस प्रश्नांवर आंदोलन तीव्र झाले पाहिजे, जसे...
सरकारी नोकरभरतीतील अन्याय
सरकारी उपक्रमांचे खाजगीकरण
जातनिहाय जनगणना
लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण
आरक्षणावरील ५० टक्के मर्यादा हटविणे
शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणे

### मंडल ते कमंडल

मंडल आयोगाचा अहवाल ( १९८० ) हा ओबीसींच्या सक्षमीकरणाचा ऐतिहासिक दस्तऐवज होता. पण १९९० मध्ये जेव्हा व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोगाची शिफारस अंमलात आणली, तेव्हा देशभरात विषारी प्रचार करण्यात आला.

माध्यमांनीही ओबीसी समाजात गैरसमज निर्माण केला. मंडलच्या प्रभावाला तोडण्यासाठीच त्याच काळात कमंडल यात्रा उभी करण्यात आली, हे आजही विसरून चालणार नाही.

### सध्याचे वास्तव

आज मोठ्या प्रमाणावर सरकारी नोकर भरती थांबवली जात आहे.

खाजगीकरणामुळे आरक्षणाला मारक परिस्थिती तयार केली जात आहे. विद्यार्थ्यांना पूर्ण शिष्यवृत्ती न देता अर्धवट शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या प्रगतीत अडथळे घातले जात आहेत. नॉट फार सुटेबल या नावाखाली आरक्षणाची गळचेपी केली जात आहे.

रोहिणी आयोगाने ओबीसींना मिळणारे २७ टक्के आरक्षण तीन गटात विभागण्याची शिफारस केली आहे. हा प्रस्ताव समाजाच्या एकतेला बाधक ठरू शकतो.

दुसरीकडे बिहारने जातनिहाय जनगणना करून लोकसंख्येनुसार आरक्षण दिले, तर दक्षिण भारतातील राज्यांनी ५० टक्केची मयार्दा केव्हाच ओलांडून ती नवव्या अनुसूचीत टाकली. महाराष्ट्रात मात्र समाज या गोष्टींपासून अनभिज्ञ आहे.

### मुख्य प्रश्न कोणता?

मराठा समाजाचा ओबीसी आरक्षणात समावेश शक्य नाही. त्यामुळे समाजाला भुलवण्याऐवजी जातनिहाय जनगणना आणि ५० टक्के आरक्षण मयार्दा हटविणे हाच खरा तोडगा आहे. आज जेव्हा बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, कायदा सुव्यवस्था यांसारखे गंभीर विषय उभे ठाकले आहेत, तेव्हा आरक्षणाच्या वादामुळे हे प्रश्न मागे पडत आहेत.


### निष्कर्ष

ओबीसींनी आपले हक्क ओळखून सजग व्हावे. नेते, संघटना आणि राजकीय पक्षांनी एकत्र येऊन या लढ्याला दिशा द्यावी. आरक्षणाच्या वादाला तोडगा फक्त दोनच... जातनिहाय जनगणना आणि ५० टक्के मर्यादा हटविणे. समाजाने हेच लक्षात ठेवून पुढील लढ्याची तयारी निश्चितपणे करायलाच हवी.

■ ■ ■

# प्रज्ञाचक्षु तत्वज्ञ : संत गुलाबराव महाराज

महाराष्ट्राच्या थोर संत परंपरेतील अलीकडच्या काळातील ज्ञानेशकन्या म्हणून संत ज्ञानेश्वरांच्या तत्व चिंतनाला जीवन समर्पित करणारे संत गुलाबराव महाराज होय.



त्यांचा जन्म सन १८८१ ला आजोळघरी लोणी टाकळी, जि. अमरावती येथे गोंडूजी आणि आलोकाबाई मोहोड या दांपत्याच्या पोटी झाला. वयाच्या नवव्या महिन्यातच त्यांच्या डोळ्याला जंतूसंसर्ग झाल्यामुळे अंधत्व आले.

संत भूतलावर जन्म घेतात ते जीवांच्या कल्याणासाठी, त्यांना लाभलेले आयुष्य जरी कमी असले तरी समाजाप्रतीचे योगदान अफाट व अतुलनिय असते. संतांचा जीवनक्रम आणि कायार्ची भिन्नभिन्न वैशिष्ट्ये असतात.

संत गुलाबराव महाराजांना 'ज्ञानेशकन्या' आणि 'प्रज्ञाचक्षु' या संबोधनाने ओळखल्या जातात. श्रीकृष्णाच्या प्रेमात रममान झालेले व संत ज्ञानेश्वरांच्या वांग्मयावर अफाट प्रेम करणारे गुलाबराव महाराज स्वतःला ज्ञानेशकन्या मानतात. तर दुसरे प्रज्ञाचक्षु म्हणजे अशी व्यक्ती जी जन्मानंतर आंधळी झालेली असली तरी बुद्धीच्या आणि बुद्धिमत्तेच्या बळावर सर्व गोष्टींचे मर्म जाणतो अशांना प्रज्ञाचक्षु म्हणतात. हाच स्वरूपधर्म संत गुलाबराव महारांजांच्या बाबतीत तंतोतंत लागू होते.

संत गुलाबराव महाराजांचा जीवनपट बघता अतिशय प्रतिकुल परिस्थितला आहे. नऊ महिन्याचे असताना त्यांच्या डोळ्याला जंतू संसर्ग झाल्यामुळे त्यांना कायमचे अंधत्व आले. वयाच्या चौथ्या वर्षी आई वारली. पुढे लोणी टाकळीहून माधान येथे आले.त्यांच्यात थोर प्रज्ञाशक्ती त्यांच्या प्रगट झाली. त्या बळावरच पुरातन ग्रंथांचे आकलन ते सहज करीत गेले. मनकर्णिका सोबत विवाह झाला. लक्ष्मण भटांकडून संस्कृत ग्रंथ ऐकून पाठांतर केले.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

त्यांनी आकलन, शब्द रूपावली, लघु व्याकरण ही ग्रंथे मुखद्गत करून त्यांनी संस्कृत भाषेतही प्रवेश मिळविला. इतर धर्मांचे ग्रंथांचे श्रवण त्यांनी केले. अल्पावधीत संस्कृत पंडित झाले. जन्मतःअंध असताना; कुठलेही शिक्षण नसताना श्रवण पाठांतराच्या बळावर विपुल ग्रंथ लेखन इतरांकरवी करून घेतले, हे मोठे विलक्षण वाटते.

मराठी, हिंदी, संस्कृत भाषेवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. गुलाबराव महाराजांनी काव्यशास्त्र, आयुर्वेद, संगितासह अनेक भाषेसोबतच बोली भाषेत अनेक विषयांवर विपुल लेखन केले आहे. सूत्रग्रंथ, भाष्य, प्रकरण, आत्मचरित्र, आख्यान, नाटक, लोकगीते, स्तोत्र, व्याकरण, कोश, आदी वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले.

सहस्त्र ओव्या, श्लोकांची निर्मिती त्यांनी केली. अलौकिक व्याख्याने..धर्म समन्वय... प्रेम निकुंज.. योग प्रभाव.. साधूबोध ही त्यांची प्रचलित पुस्तके होय. महाराजांच्या ग्रंथसंपदेचे जतन करण्याचे कष्ट डॉ. राम पंडितांनी केले होते.

एकही वर्ग शाळा न शिकलेले संत गुलाबराव महाराज एका विलक्षण बुद्धीच्या बळावर अलीकडच्या शास्त्रज्ञांच्या सिद्धांतावर त्यांनी अभ्यास केला. त्यामध्ये डार्विनचा उत्क्रांतीवाद, आईन्स्टाईनचा अणुसिद्धांत, जगदीशचंद्र बोस यांचे वनस्पतीशास्त्र या सर्वांचा सखोल अभ्यास करून सटीक लेखन करून ठेवले.

संत गुलाबराव महाराजांचे कार्य ज्ञान, विज्ञान, धर्म, संस्कृती एवढ्या पुरतेच मर्यादित नसून त्यांनी साधुबोध या ग्रंथातून मानवी जीवनाचा उद्धार कसा होईल याचे विवेचन सुद्धा केले आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीची सांगड घालून जीवन कसे जगावे? याचे अनमोल मार्गदर्शन लाभलेले आहे. पावसाच्या पाण्यावर जो शेतकरी अवलंबून राहील त्याची पूर्णतः प्रगती आयुष्यात कधी होणार नाही.पाण्याचा अभाव असताना त्याला तांत्रिक पद्धतीने पाण्याच्या शेतीसाठी उपयोग करून घेता येईल, तोच शेतकरी विकासाच्या वाटेने मार्गस्थ होईल. असे ते स्पष्टपणे मांडतात.

वेदांतकेसरी बाबाजी महाराज पंडित या शिष्यावर त्यांचे प्रचंड प्रेम होते.त्यांनी महाराजांची ग्रंथसंपदा जतन केली. त्यांचा ग्रंथसंग्रह आजही अमरावतीच्या परकोटीच्या आत दहिसाथीत असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरात सुरक्षितपणे जपून ठेवल्याचे सांगितले जाते.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा फेटा घातलेले पहिले तैलचित्र अकोल्याच्या चित्रकारांकडून गुलाबराव महाराजांनी करून घेतले होते. ते तैलचित्र आजही आळंदीच्या संजीवन समाधी मंदिराच्या गाभाऱ्यात दर्शनी भागावर आहे. हे महाराष्ट्रासाठी सर्वात मोठी देणगी आहे. असा हा तत्वज्ञानी समाजाला तत्त्वचिंतनाचे दान सपूर्द करून वयाच्या चौत्तीसाव्या वर्षी जगाचा निरोप घेतला. आज भाद्रपद शुक्ल द्वादशी पुण्यस्मरण दिनाच्या प्रसंगी महात्म्याला शब्दसुमनें समर्पित करुया..!

■ ■ ■

# गणेश विसर्जन करतांना बाळगावी सावधगिरी!


सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात अतिवृष्टीमुळे, ढगफुटीमुळे अनेक भाग जलमग्न झालेला आहे. यामुळे काही भागातील नदी-नाले, तलाव, विहिरी व समुद्र किनारा या सर्व तुडुंब भरलेल्या आहेत. गणपती स्थापनेच्या दिड दिवसांपासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरूवात झालेली आहे. त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

गणपती विसर्जन करतांना नदी, तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत दुर्घटना होऊ शकते अशा प्रकारच्या यापूर्वी अनेक दुर्घटना झालेल्या आहेत ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. मागील वर्षी २०२४ ला राज्यभरात गणेश विसर्जनाला गालबोट लागले व १५ जणांचा मृत्यू झाला.धुळ्यातील चितोड येथे ३ बालकांचा मृत्यू झाला, नाशिक येथील पाथर्डी फाटा परिसरात २ युवकांचा मृत्यू झाला, अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात ३ जण नदित वाहून गेले,

अहमदनगर जिल्ह्यात २ युवकांचा मृत्यू, जिंतूर तालुक्यात २ जणांचा मृत्यू, अकोला जिल्ह्यात एकाजणाचा मृत्यू. त्यामुळे गणेश विसर्जन सावधगिरीने करावे.त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासुन दुरच ठेवावे. कारण छोटीशी चुक परिवारावर मोठा आघात करू शकते.

खेड्यापाड्यात, शहरात बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी भक्तगण विसर्जनाच्या ठिकाणी जातात. अशा परिस्थितीत कोणताही धोका ओढवून नये याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे. गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच.प रंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण (स्थळ) दिले आहे किंवा प्रशासनाने बनवलेल्या कृत्रिम तलावामध्ये विसर्जन करायला हवे.

यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येवु शकते.त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळुन सवार्नी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगवी. मुर्ती विसर्जनाच्या वेळेस जिवीत हानी व दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत. या संपूर्ण गोष्टी डोळ्यासमोर ठेवून व सतर्कता बाळगुन गणेश विसर्जन केले पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

ज्या-ज्या ठिकाणी कृत्रीम तलावची व्यवस्था केलेली आहे, त्या त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था नाही असे भक्तगण नदी, विहीर, समुद्र किनारा किंवा तलावामध्ये गणरायाचे विसर्जन करतात त्या त्या ठिकाणी सर्वांनीच विसर्जन करतांना काटेकोरपने सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.

मुख्यत्वेकरून मंडळांचे मोठे गणपती असतात. अशा परिस्थितीत मंडळाच्या भक्तांनी गणपती विसर्जन करतांना सतर्कता बाळगून व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून विसर्जन करावे. छोटीशी चुक मोठा आघात पोहचवू शकते.

गणेश विसर्जनाच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की बाप्पांना निरोप देतांना गणेश विसर्जनाची प्रक्रीया सांभाळून करावी. त्याचप्रमाणे निर्माल्य तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या ठिकाणी केली आहे त्याठिकाणीच टाकावे. यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दुषित होण्यापासुन वाचेल. सोबतच जलचर प्राण्यांचे प्राणसुध्दा वाचेल.

अशाप्रकारे संपूर्ण गणेश भक्तांनी काळजी घेणे आवश्यक आहे. गणपती बाप्पा आपल्या घरी दरवर्षी येणार.कारण गणेश विसर्जन करतांना गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या! असा जयघोष करून बाप्पाणा आपण निरोप देवून विसर्जन करतो. परंतु गणेश विसर्जनाच्या निमित्ताने गणेश भक्तांनी आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावुन गणरायाला निरोप द्यावा.यामुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे.गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या... जय श्री गणेशाय नमः!



# महिलांनो रोज लिपस्टिक लावत असाल तर सावधान!

लिपस्टिक म्हटलं की श्रृंगारातील महिलांचा आवडती मेकपची वस्तू. अनेकींना तर लिपस्टिकचे कलेक्शन करणे प्रचंड आवडते. लिपस्टिक लावणे आजकाल प्रत्येक महिलेच्या मेकअप रूटीनचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. पण तुम्हाला माहिती आहे का की दररोज लिपस्टिक लावण्याची सवय हळूहळू आरोग्याला हानी पोहोचवू शकते?

### लिपस्टिकमध्ये शिसे असते

बहुतेक लिपस्टिकमध्ये शिसे नावाचा हानिकारक धातू असतो, जो हळूहळू शरीरात जमा होऊ लागतो आणि हार्मोनल असंतुलन, प्रजनन समस्या आणि मानसिक विकासात अडथळा निर्माण करू शकतो. लिपस्टिक वारंवार लावल्याने आपण काही खाताना, जेवताना किंवा पाणी पिताना देखील थोडी थोडी लिपस्टिक आपल्या पोटात जाते आणि त्याद्वारे हे रसायन शरीरात जाते ज्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो.

### ओठ काळे आणि कोरडे होऊ शकतात.

लिपस्टिकमध्ये असलेले रसायने आणि प्रिजर्वेटिव्स ओठांमधील ओलावा काढून टाकू शकतात, ज्यामुळे ते हळूहळू कोरडे, फाटलेले आणि काळे होऊ शकतात. जर तुम्ही दररोज लिपस्टिक लावली तर कालांतराने तुमचे ओठ त्यांचा नैसर्गिक गुलाबीपणा गमावून बसतात.

लिपस्टिकमध्ये पॅराबेन्स, कॅडमियम आणि क्रोमियम सारखी अनेक प्रकारची रसायने असतात, जी शरीरात हळूहळू विषबाधा निर्माण करू शकतात. या घटकांमुळे कर्करोगासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. लिपस्टिकच्या सतत संपर्कात राहिल्याने हे विषारी पदार्थ शरीरात जमा होऊ शकतात.

लिपस्टिकमध्ये असलेल्या रसायनांमुळे काही लोकांना ओठांवर ॲलर्जी, खाज सुटणे आणि जळजळ होण्याची शक्यता असते. विशेषतः जर तुम्ही स्वस्त किंवा लोकल शॉपमधून घेतलेली लिपस्टिक वापरत असाल तर त्यामुळे त्वचेचा संसर्ग देखील होऊ शकतो.

तुम्ही लिपस्टिक लावता तेव्हा ती दिवसभर हळूहळू तुमच्या पोटात जात असते. लिपस्टिकमधील हानिकारक रसायने खाताना आणि पिताना पोटात जातात. त्यामुळे यकृत आणि पोटाला नुकसान पोहोचवू शकतात, ज्यामुळे पचनसंस्था कमकुवत होऊ शकते.

### काय काळजी घ्यावी?

नैसर्गिक गोष्टींपासून बनलेली आणि हर्बल लिपस्टिक वापरा. लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांवर लिप बाम किंवा खोबरेल तेल लावा. झोपण्यापूर्वी ओठांवर लावेली लिपस्टिक पूर्णपणे स्वच्छ करा जेणेकरून रसायने ओठांवर राहणार नाहीत. दररोज लिपस्टिक लावणे टाळा आणि कधीकधी नैसर्गिक लूक द्या. कारण त्यातही आता वेगवेगळे रंग येतात. त्यामुळे लिपस्टिक लावण्यापेक्षा तुम्ही तेही लावू शकता. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# निर्माल्य रथ

देवपूजेचे निर्माल्य
फेकू नये नदीत
जमा करून ठेवावे
टाका शेतामध्ये मातीत..

जल प्रदुषणाला तर
बसेलच आळा
शेतीचा पोत ही सुधरेल
हा नियम पाळा ..!

पुजेच्या निर्माल्याचे
करण्या योग्य विसर्जन
निर्माल्य रथाची संकल्पना
गावात राबवू या सर्वजण..!

# गुन्हे शाखा करणार वर्मा आत्महत्येचा तपास

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३ :

शासकीय कंत्राटदाराच्या आत्महत्येचे प्रकरण आता गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास युनिट-२ चे पोलिस निरीक्षक यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

गुन्हे शाखा या प्रकरणाचा नव्याने तपास करणार आहे. पेनामाचा व्यंकटेश्वरा वर्मा (६१) रा. राजनगर असे मृत शासकीय कंत्राटदाराचे नाव आहे. या प्रकरणी सदर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून प्राथमिक तपास केला होता. मोबाईल ताब्यात घेऊन सीडीआर काढण्यात आला, तसेच तांत्रिक विश्लेषणासाठी मोबाईल सायबर ठाण्यात पाठविण्यात आला आहे.

या प्रकरणात वर्मा यांचा चालक, स्वयंपाकी तसेच त्यांच्याकडे नियमित येणारे, घटनेच्या आदल्या दिवशी भेटायला येणारे आणि शेवटच्या कॉलरची चौकशी होणार आहे. यासोबतच

### मोबाईल पाठविला तांत्रिक विश्लेषणासाठी

वर्मा यांच्या पत्नीचे बयाण नोंदविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने नवीन खुलासे होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वर्मा यांची पत्नी आणि दोन मुले हैदराबादला गेल्यापासून ते राजनगरातील घरी एकटेच राहायचे. जवळपास २०१९ पासून ते एकटेच होते. अधूनमधून पत्नी भेटायला यायची. विशेष म्हणजे त्यांच्या घरी भेटायला येणाऱ्यांची वदर्ळ असायची. बरेचदा ते दार बंद करून घरात बसून राहायचे. दार बंद दिसले की जवळपास विचारपूस करून अनेक जण निघून जात.

त्याचप्रमाणे अनेकदा ते घरीदेखील येत नव्हते. घरी कोण आले होते, किती लोक होते, आत कोणी थांबलेले आहे काय, अशी बाहेरच्या बाहेर शेजाऱ्यांना विचारणा केल्यानंतरच ते घरी परतायचे.

### मध्यरात्रीच घेतला गळफास ?

वर्मा यांनी नेहमीप्रमाणे रविवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास भोजन केले आणि चौकीदाराला मुख्य गेट लावण्यास सांगितले. सोमवारी सकाळी त्यांचे मित्र भेटायला गेले. मात्र, दार बंद होते. मित्रांनी दार ठोठावले. मात्र, आतमधून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी चौकीदाराला बोलाविले. त्यानेही दार ठोठावले. दरम्यान या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. सदर ठाण्याचे पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले. दार उघडून आतमध्ये गेले असता वर्मा पंख्याला दुपट्ट्याने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. कदाचित मध्यरात्रीच गळफास घेतला असावा, अशी चर्चा आहे.

यावरून कदाचित त्यांच्यावर कर्ज असावे आणि कर्जदार पैसे मागण्यासाठी त्यांच्याकडे येत असावे, त्यांचा सामना करण्यापासून वाचण्यासाठी वर्मा यांना ही कसरत करावी लागायची. कदाचित अलीकडे कर्जदारांचा जास्तच तगादा वाढला असेल. आता कुठलाच मार्ग नाही, बहाणासुद्धा नसल्यामुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलले असावे, अशी चर्चा आहे.

### चाळीस कोटींचे होते कर्ज?

साई असोसिएट्स कन्स्ट्रक्शन कंपनी या नावाने प्रतापनगरात त्यांचे कार्यालय होते. सध्या चंद्रपूर, नागपूर या दोन ठिकाणी त्यांची कामे सुरू आहेत. बांधकामासाठी मोठा खर्च होत असल्याने दोन वर्षांपूर्वी त्यांनी एका बँकेकडून चाळीस कोटींचे कर्ज घेतले होते. आर्थिक टंचाई वाढत होती, तसेच कर्जाचा बोझा आणि वाढत्या तगाद्यामुळे ते तणावात होते. यातूनच त्यांनी टोकाचा निर्णय घेतला असावा, अशीही चर्चा आहे.

## डॉ. अतुल वैद्य यांची कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालाच्या प्रभारी कुलगुरूपदी नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. ३ :



लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांची कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या प्रभारी कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचा आदेश राजभवन कडून जारी करण्यात आला. डॉ. वैद्य हे नीरी चे संचालक म्हणून निवृत्त झाले आणि त्यानंतर त्यांनी लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ. वैद्य यांनी केमिकल इंजिनिअरींग मध्ये पदव्युत्तर पदवी आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई येथून पीएचब डी. प्राप्त केली आहे. त्यांना ३४ वर्षांचा संशोधन अनुभव असून, पर्यावरण, कचरा व्यवस्थापन अशा विषयांमध्ये त्यांनी संशोधन केले आहे.

अध्यापन, संशोधन आणि प्रशासन या तीनही आघाडयांवर त्यांचे कर्तृत्व प्रख्यात आहे. नीरी चे संचालक म्हणून त्यांचा कार्यकाळ विशेष दखलपात्र ठरला आहे. अत्यंत साधे, निगर्वी, कामसू, प्रशासन कौशल्य असलेले आणि शैक्षणिक संस्थांच्या जडणघडणीचा विकासाचा ध्यास घेवून त्यासाठी दूरदृष्टी ठेवून योजना कार्यान्वित करण्यासाठी ते प्रसिद्ध आहेत. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यावरण क्षेत्रासाठी त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. पर्यावरण क्षेत्राशी संबंधित २०० हून अधिक प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत. ८० हून अधिक संशोधन लेख विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील जर्नल मध्ये प्रकाशित झाले आहे. १२ विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचब.डी प्राप्त केली आहे. यावेळी विश्वविद्यालयाचे कुलसचिव सर्व अधिष्ठाता व संवैधानिक अधिकारी व कर्मयोगी यांनी कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांचे अभिनंदन व नियुक्तीचे स्वागत केले आहे.



संजय अडलोक ८२, विनायक नगर, बेसा पावर हाऊस मागे माळगी नगर नागपूर



ॲड. मिथिल कोलतो, नागपूर.



सुरेश नामदेवराव हेडाऊ नाईक तलाव बंगलादेश नागपूर यांच्या घरी स्थापित गणेशमूर्ती,

# महाव्यवस्थापकांकडून मध्य रेल्वेतील १० कर्मचाऱ्यांना सेफ्टी पुरस्कार प्रदान

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३ :

धरमवीर मीणा, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी ०२.०९.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात मध्य रेल्वेतील १० कर्मचाऱ्यांना सेफ्टी पुरस्काराने गौरविले. यामध्ये मुंबई विभागातील ६, सोलापूर विभागातील २ तसेच नागपूर व पुणे विभागातील प्रत्येकी १ कर्मचारी यांचा समावेश आहे.

हे कर्मचारी त्यांच्या कर्तव्यावरील सतर्कता, संभाव्य अपघात टाळण्यासाठी केलेले योगदान व रेल्वे गाड्यांच्या सुरक्षित परिचालनाची खात्री यासाठी गौरविण्यात आले. प्रत्येक पुरस्कारामध्ये एक मेडल, प्रशस्तिपत्र, उल्लेखनीय कार्याचे प्रमाणपत्र व रु. २०००/-रोख रक्कम समाविष्ट आहे.



नागपूर विभागातील मालखेड स्टेशनवर कार्यरत पॉईंट्समन श्री निलेश यांनी ०१.०८.२०२५ रोजी ड्युटीवर असताना मालगाडीशी सिग्नल एक्स्चेंज करताना एका डब्यात हॉट ॲक्सल असल्याचे लक्षात आणले. त्यांनी तत्काळ लाल झेंडा दाखवून स्टेशन मास्टरांना कळिवले. त्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य अपघात टळला.

महाव्यवस्थापकांनी पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून सांगितले की अशा प्रकारची सतर्कता व निष्ठा इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरित करेल ज्यामुळे प्रवाशांची सुरक्षा निश्चित होऊन जीवित, मालमत्ता व रेल्वेची संपत्ती सुरक्षित राहील.

या प्रसंगी श्री प्रतीक गोस्वामी, अतिरिक्त महाव्यवस्थापक, श्री चंद्र किशोर प्रसाद, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी, इतर प्रधान विभागप्रमुख व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# जवाहरलाल नेहरू विद्यालयाचे जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत घवघवीत यश



■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ३ :
येथील जवाहरलाल नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानकापूर क्रीडा संकुल येथे आयोजित विभागीय जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले. १४ वर्षे मुलांच्या गटात रोहन चौधरी, अनूज मेश्राम व देवेंद्र कुलदिप तर १४ वर्षे मुलींच्या गटात हर्षिता रणदिवे यांनी उत्तुंग यश संपादन केले. तसेच १७ वर्षे मुलींच्या गटात जानवी रणदिवे व मुलांच्या गटात कुशल चौधरी यांनी चमकदार कामगिरी केली. १९ वर्षे मुलींच्या गटात हर्षिता ढवळे, तनिष्का बागडे व अर्थवी अंबादे तर मुलांच्या गटात साहिल बन्सोड, अभिषेक सुर्यवंशी व वंश भालाधरे यांनी उत्कृष्ट खेळ करत पुढील फेरीत प्रवेश मिळवला. या यशाबद्दल व्ही.एस.पी.एम. अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन संस्थेचे कार्यवाह युवराज चालखोर, प्राचार्य सचिन डेहनकर, उच्च प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक विनोद देऊळकर ,जिल्हा क्रीडा अधिकारी शशिकांत कळंबे, तालुका क्रीडा सचिव उमेश चौरे व क्रीडा शिक्षक पंकज मानेकर, प्रणय भुयार, निर्मला टेकाडे यांच्यासह इतर सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ५१ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. बुधवार(ता.३) रोजी शोध पथकाने ५१ प्रकरणांची नोंद करून २२,६००/-रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत २१ प्रकरणांची नोंद करून ८,४००/-रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.४००/-दंड) या अंतर्गत २ प्रकरणांची नोंद करून ८००/- रूपयांची वसुली करण्यात आली.वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ७ प्रकरणांची नोंद करून ६,०००/-रुपयांची वसुली करण्यात आली.चिकन सेंटर,मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता,फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १ प्रकरणाची नोंद करून रू.१,०००/- चे दंड वसुल करण्यात आले. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १७ प्रकरणांची नोंद करून ३,४००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ३ प्रकरणांची नोंद करून रु.३,०००/-चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध पथकाने नेहरूनगर झोन अंतर्गत लोकल स्वीट भंडार यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू.५,०००/-चे दंड वसूल करण्यात आले.गांधीबाग झोन अंतर्गत मे. रूकमिणी स्वीटस यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू.५,०००/-चे दंड वसूल करण्यात आले. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे.साईनाथ स्वीटस यांनी यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू.५,०००/-चे दंड वसूल करण्यात आले. आशीनगर झोन अंतर्गत सुधीर टेंभूर्णे यांनी बांधकामामुळे जवळचे चेंबर तोडल्यामुळे रू.५,०००/-चे दंड वसूल करण्यात आले.उपद्रव शोध पथकाने ४ प्रकरणांची नोंद करून रू.२०,०००/-दंड वसूल केला.

### उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई



# अनुचित घडण्यापूर्वीच आरोपीला पकडले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ : एका तरुणाने वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थिनीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. तिला लग्नाचे आमिष दाखवत पळवून नेले. तिच्यासोबत काही विपरीत घडण्यापूर्वीच लोहमार्ग पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. मोनू ऊर्फ रामकुमार सरियाम (२०) रा. खमरा, कलागाव, मध्यप्रदेश असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पीडित मुलगी मूळची पश्चिम बंगालची असून, सध्या मानकापूर ठाण्यांतर्गत एका वसतिगृहात राहून शिक्षण घेत आहे.

सध्या ती इयत्ता नवव्या वर्गात आहे. तिला आई आणि एक मोठा भाऊ आहे. आर्थिक स्थिती जेमतेम असल्याने पीडित मुलीला शिक्षण घेणे शक्य नव्हते. त्यामुळे स्थानिकांच्या माध्यमातून ती नागपुरातील एका संस्थेत शिक्षण घेत आहे. याठिकाणी नि:शुल्क शिक्षण आणि राहण्याची सोय आहे. त्यामुळे पीडितेची आई निश्चिंत होती. आरोपी मोनू हा मागील काही वर्षांपासून नागपुरात मजुरी करतो. वसतिगृहाच्या मागच्या परिसरात एका इमारतीचे बांधकाम सुरू होते. त्याच ठिकाणी मोनू काम करीत होता. दरम्यान पीडितेवर मोनूची नजर पडली. त्याने तिच्याशी ओळख करून घेतली. अधूनमधून तिच्याशी बोलायचा. या दरम्यान त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले.

लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेण्याची योजना आखली.

### प्रवाशांच्या गर्दीत दिला चकमा

सुट्या लागल्याने आई पीडितेला घेण्यासाठी नागपुरात आली. त्यांना शालीमार एक्स्प्रेसने पश्चिम बंगालला जायचे होते. एक सप्टेंबरला सायंकाळच्या सुमारास सर्वजण नागपूर रेल्वे स्थानकावर आले. फ्लाट क्रमांक ३ वर गाडी लागलीच होती. जनरल डब्यात आई सामान ठेवत होती. पीडिता भावासोबत गाडी जवळच उभी होती. दरम्यान प्रवाशांच्या गर्दीत तिने गुंगारा देत पळ काढला.

### पोलिस पथकाने घेतला शोध

गाडी सुटण्याची वेळ होऊनही मुलगी दिसत नव्हती. आई आणि भावाने सर्वत्र शोध घेतला. अखेर लोहमार्ग ठाण्यात तक्रार दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस निरीक्षक गौरव गावंडे यांनी अपहरणाचा गुन्हा नोंदवून आरोपीच्या शोधासाठी एक पथक तयार केले. या पथकात उपनिरीक्षक योगेश कातुरे, पोहवा प्रशांत उजवणे, श्रीकांत उके, चंद्रशेखर येळेकर, राहुल गवई, शशिकांत वाघमारे, आशीष काळे यांचा समावेश होता.

### कुटुंबीयांना दिला गुंगारा

नागपूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या गर्दीत तिने कुटुंबीयांना गुंगारा दिला आणि मुख्य प्रवेशद्वाराने स्टेशनबाहेर पडली. बसने छिंदवाड्याला गेली. बसस्थानकावर आधीच मोनू उपस्थित होता. तिला घेऊन तो खमरा, कलगाव येथे गेला. आईने मुलगी कुठेही दिसत नसल्याने पोलिसांत तक्रार केली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले. संस्थेत जाऊन विचारपूस केली. मोनूच्या मित्राकडे जाऊन त्याचा मोबाईल नंबर मिळिवला. मोबाईल लोकेशनवरून पोलिस गावात पोहोचले. पीडितेसोबत काही विपरीत घडण्यापूर्वीच पोलिस पथकाने आरोपीच्या मुसक्या आवळल्या. ही कारवाई पोलिस अधीक्षक मंगेश शदे, अपर पोलिस अधीक्षक दत्ताराम राठोड यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक गौरव गावंडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

## राजेश रंगारी यांची कामठी तालुका दक्षता समितीवर अध्यक्ष म्हणून नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी,
कोराडी , दि. ३ :

महादूला नगरपंचायत चे माजी अध्यक्ष, तथा नागपूर जिला भाजप उपाध्यक्ष राजेश रंगारी यांची महाराष्ट्र शासन चे मंत्रीमहोदय, यांच्या विशेष अधिकाराने तालुका दक्षता समिती वर अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या संदर्भात पत्रकारांशी बोलतांना राजेश रंगारी म्हणाले की सर्वांना सोबत घेऊन अन्नधान्य पुरवठा योजना सर्व नागरिकांना वेळेवर वाटप केल्या जाईल , सर्व स्वस्त धान्य दुकानदार यांनी त्यांच्या दुकानासमोर दक्षता समिती चां बोर्ड लावणे क्रमप्राप्त आहे त्यांनी आपल्या नियुक्ती बद्दल राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल मंत्री ना चंद्रशेखर बावनकुळे, आणिकेंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी साहेब यांचे आभार मानले आहेत.



राजेश रंगारी यांचेसह नेहा राऊत, विपसदश्य यांचे प्रतिनिधी , आ. कृपाल तुमाने विपस, हे सदस्य, अध्यक्ष नगरपालिका कामठी हे सदस्य, श्रीमती राजश्री धिवले अशासकीय सदस्य महिला, ज्योती कवडू भोयर महिला सदस्य, प्रदीप गोमकर, मयुर गणेर, सेवक उईके, विनोद पाटील, राहुल बोधारे, हबीब छवारे, विजय दूर बुडे, तहसीलदार कामठी स्वतः सदस्य सचिव यांनी रंगारी ह्यांचे अभिनंदन केले.

### नागपूर जिल्हा ग्राहक आयोगाची दयनीय अवस्था

## ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्या.एम.पी.तावडे यांना निवेदन सादर

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ३ :

ग्राहक न्याय परिषद महाराष्ट्रतर्फे ग्राहकांना न्याय मिळण्यात होणारा विलंब व नागपूर जिल्हा ग्राहक आयोगाची दयनीय अवस्था याबाबत राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्या.एम.पी.तावडे यांना निवेदन सादर करण्यात आले.

परिषदेकडून मागणी करण्यात आली की, आयोगातील प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात तसेच सर्व जिल्ह्यांत विधी सेवा प्राधिकरण अंतर्गत मोफत विधिक सल्ला केंद्रे तातडीने सुरू करण्यात यावीत.

निवेदन कार्यक्रमावेळी आयोगाच्या वतीने अध्यक्ष सचिन वाय.शिंपी, ग्रामीण अध्यक्ष सतीश सप्रे, सदस्य कल्याणी कापसे, नंदकिशोर उगांवकर, बालकृष्ण चौधरी,शीतल पेटकर व शैला वांडरे उपस्थित होते.

ग्राहक न्याय परिषद महाराष्ट्रच्या वतीने अध्यक्ष डॉ.बिप्लब मजूमदार, उपाध्यक्ष अखिल पवार, संघटक रीना राऊत, कोषाध्यक्ष अभय राऊत तसेच कार्यकारिणी सदस्य अमित रॉय यांनी प्रतिनिधित्व केले. परिषदेकडून असे नमूद करण्यात आले की ग्राहकांना त्वरित व प्रभावी न्याय मिळवून देणे हाच आमचा उद्देश असून यासाठी राज्य आयोगाने ठोस आणि निर्णायक पावले उचलली पाहिजेत.

# कळमेश्वर तालुक्यात कृषी सेवा केंद्रांची तपासणी मोहीम

■ महासागर प्रतिनिधी,
कळमेश्वर , दि. ३ :

कळमेश्वर तालुक्यातील तालुका गुन नियंत्रण निरीक्षक प्रशांत राऊत यांनी कृषी सेवा केंद्रांची तपासणी मोहीम अविरत सुरू असून तपासणीमध्ये विविध कृषी केंद्रांना तसेच शेतकरी खरेदी विक्री संस्था ना भेटी देऊन त्यांच्याकडे युरिया व डीएपी खतां चा साठा व इ पॉस मशीन मधील शिल्लक साठा यामध्ये फरक आढळून आल्यास संबंधित कृषी केंद्राला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येत आहे. शेतकऱ्यांना योग्य वेळी, माफक दराने गुणवत्तापूर्ण व प्रमाणित दर्जाचे बियाणे, खत व कीटकनाशक प्राप्त होणे हा यामागे उद्देश आहे.

युरिया व डीएपी सारख्या खतांची टंचाई भासऊन शेतकऱ्यांना जादा दराने खत विक्री केल्यास किंवा युरिया सोबत इतर कोणतेही कीटकनाशक व खते घेण्यास बाध्य केल्यास ७५८८६९१३१० या क्रमांकावर शेतकऱ्यांनी फोन करण्याचे आव्हान श्री. राऊत यांनी केले आहे.

कृषी केंद्रावर नियमबाह्य पद्धतीने कृषी निविष्ठांचे विक्री आढळल्यास संबंधितावर खत नियंत्रण आदेश १९८५, बियाणे कायदा १९६६ व बियाणे नियम १९६८अन्वये कारवाई करण्यात येणार असल्याचे तालुका गुणनियंत्रण निरीक्षक राऊत यांनी कळिवले आहे.

दरम्यान तालुक्यातील विविध कृषी केंद्रांची तपासणी प्रक्रिया अविरत सुरू ठेवणार असून कृषी केंद्र संचालकांनी आपला विक्री साठा नोंदवही, विक्री नोंदी, विहित प्रपत्रात बिल बुक, निविष्ठांचा साठा व त्यांचा विक्री चे दर फलक दररोज दर्शनी भागात लावने व विक्री संदर्भात सर्व दस्तावेज अद्यावत ठेवून संभाव्य कारवाई टाळण्याचे आवाहन सुद्धा राऊत यांनी केले आहे.

### खताची टंचाई दाखवून शेतकऱ्यांकडून जादा दराने युरिया डीएपी खते विक्री केल्याचे आढळल्यास परवाने निलंबित करण्याची शिफारस करणार : प्रशांत राऊत



# रा.काँ.पा नागपूर शहरा तर्फे मेडीकलचे वैद्यकीय अधिष्ठाता डॉ.गजभिये यांना निवेदन

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. ३ :**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नागपूर शहर तर्फे ३ सप्टेंबर २०२५ रोजी वा.शासकीय मेडिकल कॉलेज(डीन ऑफिस) इथे शहर अध्यक्ष अनिल अहिरकर यांच्या मार्गदर्शनात व शहर कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर यांच्या उपस्थितीमध्ये आणि शहर उपाध्यक्ष राजू मिश्रा यांच्या आयोजनात वैद्यकीय अधिष्ठाता(डीन) डॉ.राज गजभिये यांना नागपूर शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील रुग्णांच्या उपचारातील निष्काळजीपणा, व कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तनाबाबत आणि महाराष्ट्र सुरक्षा पथकाची गुंडगिरी अशा अनेक समस्या बद्दल निवेदन देण्यात आले. रुग्णालयाच्या परिसरात खूप घाण आहे, ज्यामुळे रुग्ण अधिक आजारी पडतात. डॉक्टर आणि इतर कर्मचारी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी असभ्य आणि अनादरपूर्ण वर्तन करतात.

रुग्णाच्या स्थितीबद्दल आणि उपचारांबद्दल कुटुंबातील सदस्यांना स्पष्ट माहिती दिली जात नाही. उपचार यंत्रांचा अभाव आपत्कालीन विभागात, डॉक्टर असूनही, रुग्णांकडे लक्ष दिले जात नाही, आणि डॉक्टर दिवसभर बहुतेक वेळ मोबाईलवर व्यस्त असतात. ज्यामुळे रुग्णांचा मृत्यू होतो. असा विविध प्रकारच्या विषया बदल निवेदन देण्यात आले.

सर्वे मुद्दे ऐकून मेडिकलचे अभियंता डीन यांनी आश्वासन दिले की स्वच्छते बद्दल सहा महिने ते एक वर्षात सर्व समस्येचे समाधान करून तसेच पेशंटच्या नातेवाईकांसाठी कॉरिडोर हॉलचे निर्माण करू, तसेच महाराष्ट्र सुरक्षा पथकच्या गुंडागर्दी स्वतः हा प्रशासन जातीने लक्ष देऊन त्यावर नक्कीच तोडगा काढून. येणाऱ्या पेशंट व त्याच्या नातेवाईकांची गैरसोय होणार नाही. असे डीन डॉ.गजभिये यांनी आश्वासन दिले. यावेळी नागपूर शहराचे युवक अध्यक्ष विशाल खांडेकर, प्रदेश सचिव नूतन रेवतकर, प्रदेश सचिव हाजी सोहेल पटेल, लक्ष्मीकांत पांडे, मुमताज बाजी, गोविंद सूतरावे, एकनाथ फलके, संतोष भुजाडे, संगीता अंबारे,शोभा येवले, जफर कुरेशी, सविता रंगारी, मनोज जरेल, शहाजा बाजी,अविनाश पाडीकर, मनिषा शाहू, सागर शिवहरे, शुभम भोंगाडे, यश पांडे, अनिकेत प्रजापती, आकाश चिमणकर आदि पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मेडिकल हॉस्पिटल मध्ये होणाऱ्या अनेक समस्या बद्दल निवेदन




# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृती अभिवादन सोहळा संपन्न

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नरखेड, दि. ३ :**
महाराष्ट्र शाहीर परिषद पुणे च्या वतीने ३१ ऑगस्ट रोजी १० वाजता लंबे हनुमान मंदिर सभाभवन रामटेक येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृती अभिवादन सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या उद्धघाटक सौ. कांचनताई माकडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष तानबा सिंगारे यांनी अण्णाभाऊ साठे व राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. तसेच सिंगारे यांनी प्रा देविदास कठाणे नवनिर्वाचित वृद्ध साहित्यिक कलाकार मानधन समिती सदस्य नागपूर जिल्हा यांना शाल पुष्पगुच्छ स्मृतिचिन्ह सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. तसेच सौ. कांचनताई माकडे यांनी मा. पुरुषोत्तम डांगोरे महाराष्ट्र कला भूषण पुरस्कार प्राप्त ता. नरखेड अध्यक्ष लोकसेवा मंडळ ऑल इंडिया यांना शाल पुष्पगुच्छ स्मृतिचिन्ह सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती .डॉ. जगदीश गुजरकर, नरेंद्र धवराळ कोषाध्यक्ष, बबनराव कोठेकर अध्यक्ष तैलिक समाज संस्था रामटेक, ढोलक वादक पत्रकार राजेंद्र बागडे, उपस्थित होते. उपस्थितीना मार्गदर्शन करताना प्रा देविदास कठाने म्हणाले माझ्या जीवनात अनेक पद भूषविले परंतु वृद्ध व साहित्य कलाकार मानधन सदस्य हे पद मला फारच मोलाचे वाटले. याच्या माध्यमातून जनतेची सेवा होऊ शकते. वर्षाला कलाकारांचे शंभर अर्ज पास होतात. परंतु तेवढ्याने भागत नाही. वर्षाला २०० अर्ज पास झाले पाहिजे म्हणून सतत प्रयत्न करीन व सर्वांना न्याय मिळेल. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते. माझे दहा भाषणाच्या बरोबर कलाकाराचे एकच गीत मोठे आहे. कलाकार हा मनापासून आपली कला सादर करून जनतेला आपले विचार पटवून सांगतो. कलेचा लोप होणार नाही. म्हणून सरकारने विविध योजना कलाकारांसाठी आणले आहेत. जे भजनी मंडळ असतील त्यांना साहित्य देण्यासाठी पंचवीस हजार रुपये अनुदान देण्याचे महाराष्ट्र सरकारने जाहीर केले आहे. या कार्यक्रमाला साठ मंडळांनी नोंदणी करून आपली कला सादर केली. उपस्थित प्रा. डॉ. समर मोटघरे, युवराज अडकणे, शामराव चकोले, श्रीधर पुंड, दिनेश मून, विलास सरोदे, गजानन डोरले, देवराव केवट, तुकाराम रोशनखेडे, भास्करराव उमाळे, विष्णू समरीत, श्रीधर सोमकुवर, कैलास कारेमोरे, अंकुश देशमुख, भागवतराव सहारे, गफ्फार सय्यद, किरण नानवटकर, मोरेश्वर माकडे, पुरुषोत्तम गजभिये, भारती गायकवाड, बालकचंद बागडे, हनुमंत वरघट, भाऊराव राऊत (ढोलक मास्टर), सचिन कडू, सुलोचना गजभिये, शेषराव काळे, भूषण भोयर, राजूभाऊ चरडे, आदी महिला पुरुष युवक मोठ्या संख्येनेत उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन युवराज अडकणे प्रास्ताविक, समर मोटघरे तर आभार दिनेश मून यांनी मानले.



# पवित्र सुवर्णप्राशन संस्कार सोहळा उत्साहात,विश्वकुंभ आयुर्वेदिक चिकित्सालयाचे आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. ३ :**
विश्वकुंभ आयुर्वेदिक चिकित्सालयात पवित्र सुवर्णप्राशन संस्कार सोहळा गुरुवार २१ ऑगस्ट रोजी डॉ. संतोष सुर्यकांत पुसदकर यांच्या उपस्थितीत पार पडला.पुष्य नक्षत्राच्या शुभमुहूर्तावर झालेल्या या विशेष उपक्रमात लहान बालकांना सुवर्णप्राशन देण्यात आले. या संस्काराच्या माध्यमातून बालकांचे शारीरिक आणि बौद्धिक स्वास्थ्य वृद्धिंगत करण्याचा संकल्प करण्यात आला.डॉ. संतोष पुसदकर यांनी पालकांना मार्गदर्शन करताना




सांगितले की, ङ्गसुवर्णप्राशन हे आयुर्वेदातील एक प्राचीन संस्कार असून यामुळे मुलांची रोगप्रतिकारक शक्ती, स्मरणशक्ती व बुद्धी वाढीस लागते. नियमित सुवर्णप्राशन केल्यास उत्तम आरोग्य आणि आत्मविश्वास विकसित होतो.

यावेळी मोठ्या प्रमाणात पालकासह बालक उपस्थित होते.लावली आणि आयुर्वेदिक परंपरेचा लाभ घेतला. डॉ. पुसदकर यांनी पुढील पुष्य नक्षत्रालाही सुवर्णप्राशन सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## गणेशउत्सव मंडळ भगवान नगर येथे आधार कार्ड शिबीर संपन्न

**नागपूर:** युवा गणेश उत्सव मंडळ भगवान नगर येथील मंडळाला विशाखा बांते नगर सेविका, कार्यकर्ते, शरद बांते, मंडळ अध्यक्ष आकाश ढवळे, मिलिंद अलोणे , संकेत टाले, हरशु टाले, सचिन,जाधव,विनोद कराळे , साहिल कराळे. सचिन गजभिये,नरेश चव्हाण,गोलू बोरकर,मंगेश गाखरे,शंकर जळवे,रवी लोटकरे,गणेश ठाकूर,पायल चौधरी,अश्विनी वाहने,मीनाक्षी देशमुख,सुनील कोल्हे,मिथिलेश शाहू,योगेश मडावी, संस्कार गजभिये आदी कार्यकर्ते उपस्थिती होते आधार कार्ड, आभा कार्ड, आयुष्मान कार्ड विविध प्रकारच्या शिबिरात कार्ड काढण्यात आले.



# अंबाझरी ऑर्डिनन्स फॅक्टरीत बोगस निविदा प्रक्रिया

## सीबीआयने माजी डीजीएमवर नोंदविला गुन्हा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :** केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय)च्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने अंबाझरी येथील ऑर्डिनन्स फॅक्टरीच्या निविदा प्रक्रियेत झालेल्या घोटाळा प्रकरणी माजी उपमहाव्यवस्थापक दीपक लांबा याच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल केला आहे. नागपूरस्थित यंत्र इंडिया लिमिटेड (वायआयएल) चे उपमुख्य दक्षता अधिकारी डी.के.टी. गुप्ता यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. गुप्ता यांनी ७ जुलै रोजी सीबीआयकडे तक्रार दाखल केली होती, ज्यामध्ये त्यांनी आरोप केला होता की लांबा यांनी एका खाजगी कंपनीला फायदा मिळवून देण्यासाठी त्यांच्या पदाचा गैरवापर केला. ही कंपनी त्यांनी एका नातेवाईकाच्या नावावर स्थापन केली होती. बनावट कागदपत्रांचा वापर करून त्यांनी या फर्मला निविदा दिल्या. सीबीआयकडून मिळालेल्या माहितीनुसार, लांबाने त्याचा चुलत भाऊ मोहित थोलिया याच्या नावाचा वापर करून ऑटोमेशन इंजिनिअरिंग अँड इंडस्ट्रियल सर्व्हिसेस नावाची एक प्रोप्रायटरशिप फर्म स्थापन केली. या फर्मने सादर केलेल्या बनावट अनुभव प्रमाणपत्रांच्या आधारे निविदा देण्यात आल्या. तपासात फर्मच्या बँक खात्यांमध्ये आणि लांबा व त्याच्या कुटुंबातील सदस्यांमध्ये (ज्यामध्ये त्याचा भाऊ, पत्नी, बहीण आणि आई यांचा समावेश आहे) अनेक संशयास्पद आर्थिक व्यवहार उघड झाले. या व्यवहारांवरून असे दिसून येते की लांबा यांचा फर्ममध्ये थेट आर्थिक हितसंबंध होता. सीबीआय अधिकाऱ्यांनी आरोपींची कार्यालये आणि घरांसह चार ठिकाणांची झडती घेतली. या दरम्यान आक्षेपार्ह कागदपत्रे आणि डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले. इतर अधिकारी आणि खाजगी व्यक्तींचाही या घोटाळ्यात सहभाग असल्याचा संशय आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी केली जात आहे. सक्षम अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १७अ अंतर्गत लोकसेवकाविरुद्ध चौकशी करण्यासाठी आवश्यक ती परवानगी दिली. त्यानंतर, सीबीआयने फसवणूक, गुन्हेगारी कट रचणे आणि भारतीय दंड संहिता, २०२३ च्या कलम ६१(२), ३१८(४), ३३६(३), आणि ३४०(२) आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. ३ :**
राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयामार्फत सन २४-२५ करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कारङ्क तसेच डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कारङ्क देण्यात येणार आहेत. इच्छुक ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह ३० सप्टेंबरपर्यंत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे तीन प्रतीत



पाठवावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे प्र. संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

या पुरस्कारांचा उद्देश शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास घडवून आणणे, जनतेला अधिकाधिक ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करून देणे व वाचनसंस्कृती वृद्धिंगत करणे हा आहे. शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क, ड वर्गातील उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख, ७५ हजार, ५० हजार व २० हजार रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट प्रदान करण्यात येईल. राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथसेवक यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे. राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रदीर्घकाळ सेवा देणाऱ्या कार्यकर्त्यांना व सेवकांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

# ब्रह्माकुमारी विश्वशांती सरोवर येथे तरुणांसाठी विशेष चर्चासत्र संपन्न

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**
ब्रह्माकुमारी विश्व शांती सरोवर येथे तरुणांसाठी एक विशेष जीवन परिवर्तनकारी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात माउंट अबूहून आलेले डॉ.शक्तीराज भाई, नागपूर विभागाच्या संचालिका राजयोगिनी बी.के. रजनी दीदी जी, सह-संचालक बी.के. मनीषा दीदी जी इत्यादी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचा विषय 'स्वतःचे सर्वोत्तम रूप बना' होता, ज्याला जगप्रसिद्ध माइंड पॉवर ट्रेनर आणि वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर डॉ.बी.के.शक्तीराज भाई यांनी संबोधित केले. देश-विदेशातील लाखो विद्यार्थी, खेळाडू, आयपीएल संघ आणि सेलिब्रिटींना माइंड पॉवर, सकारात्मक विचार आणि सकारात्मक जीवनशैलीचे प्रशिक्षण देणारे डॉ.शक्तीराज भाई यांनी तरुणांना जीवनात पुढे जाण्यासाठी मौल्यवान टिप्स दिल्या.



चर्चासत्राची सुरुवात करताना डॉ.शक्तीराज भाई यांनी तरुणांना मानसिक अडथळ्यांवर मात कशी करावी हे शिकवले आणि मेंटल ब्लास्ट टेक्निक, एक शक्तिशाली व्हिज्युअलायझेशन तंत्र, ज्याद्वारे सोशल मीडियाचे व्यसन, नकारात्मक संस्कार, भीती, अतिविचार, स्टेजवरील भीती, फोबिया, वाईट विचार इत्यादी सोशल मीडियाचे व्यसन, नकारात्मक संस्कार, भीती, अतिविचार दूर करता येते-असे मत जगप्रसिद्ध वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर डॉ.बी.के.शक्तीराज यांनी कार्यक्रमा प्रसंगी व्यक्त केले.



# आंबेडकर महाविद्यालय ईडी सेलच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

## टेक्निकल स्पर्धेत प्रथम क्रमांक

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :** वायसीसीई महाविद्यालय आयोजित स्टार्टअप सागा स्पर्धा -टेकरूट्स १५.० मध्ये डॉक्टर आंबेडकर महाविद्यालयातील बीसीए पाचव्या सेमिस्टरचे विद्यार्थी गुरु येलणे आणि सुजित गलबले यांनी आपला स्क्रॅप इट अप हा अभिनव स्टार्टअप सादर करून पहिला क्रमांक पटकावला. या यशामागे ईडी सेल समन्वयक डॉ. दुर्गा पुट्टेवार यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीमती दीपा पान्हेकर यांनी विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पकतेचे, तांत्रिक कौशल्याचे आणि सर्जनशीलतेचे कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी हे यश संपूर्ण विद्यार्थी समुदायाला मोठे स्वप्न पाहण्याची व अधिक उंच भरारी घेण्याची प्रेरणा देईल असे सांगितले. ईडी सेलच्या प्रियांका सोईतकर आणि डॉ. नम्रता प्रज्ञाकर तसेच बीसीए विभागप्रमुख डॉ. प्रशांत येंडे यांनीही विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बेसापिपळा येथे घरगुती गणपती सजावट स्पर्धा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. ३ :**
पिपळा येथील देशगौरव प्रतिष्ठान, दत्तधाम नगर उत्सव मंडळ व सांस्कृतिक क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने घरगुती गणपती सजावट स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रेरणेने व देशगौरव प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा पिपळाचे माजी सरपंच नरेश भोयर यांच्या सहकार्याने होत आहे. या स्पर्धेचे संयोजक प्रशांत गणोरकर आहेत. गेल्या वर्षी पहिल्यांदा ही स्पर्धा घेण्यात आली होती. यंदा दुसऱ्या वर्षी ती अधिक मोठ्या स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांकाला ७ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ५ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाला ३ हजार रुपये अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. तसेच अनेक प्रोत्साहनपर बक्षिसे, सहभाग प्रमाणपत्रे व विशेष लकी ड्रॉची सोय आहे.

स्पर्धेसाठी नोंदणी क्यु आर कोडद्वारे करावी लागणार असून, सजावटीचा फोटो, व्हिडिओ व मोबाईल क्रमांक पाठवणे आवश्यक आहे. नोंदणीची अंतिम तारीख ५ सप्टेंबर असून, परीक्षक मंडळाचा निर्णय अंतिम मानला जाईल.

या स्पर्धेचा उद्देश घराघरातील गणेशभक्तांना कलात्मकतेला वाव देणे, सामाजिक सलोखा आणि पर्यावरणपूरक दृष्टीकोन यांचा प्रसार करणे हा आहे. अशी माहीती माजी सरपंच नरेश भोयर यांनी दिली आहे.

**संपर्कासाठी :** ७६६६७३१६७२ / ७४१४९९४९५४ / ७०६६५८०४०६या नंबरवर फोन करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# इंटास फाउंडेशन अपना घर येथे रक्षाबंधन सण साजरा




■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :** कुटुंबापासून दूर कर्करोगाशी झुंज देणारे कर्करुग्ण व काळजीवाहक यांनी इंटास फाउंडेशन अपना घर येथे हास्य, करुणा आणि एकतेच्या भावनेने भरलेला रक्षाबंधनाचा हृदयस्पर्शी सण मोठ्या उत्साहाने साजरा केला.

जे काळजीवाहक शक्ती आणि भावनिक आधाराचे प्रतीक आहे, त्यांनी उत्सवाची सुरुवात पारंपरिक राखी बांधणीने केली. संपूर्ण वातावरण उत्सवपूर्ण संगीत, हास्य आणि भारलेपणाने भरले होते.

समुपदेशिका यांनी सांगितले की, हितचिंतकांनी प्रेमाने हाताने बनविलेल्या राख्या सर्व रुग्णांना आणि काळजीवाहक यांना बांधण्यात आल्या आहेत जे अवीट प्रेमाचा गोडवा प्रदर्शित करतात. इंटास फाउंडेशन हे आश्रयस्थान नाही तर एक कुटुंब आहे. अशा प्रकारच्या उत्सवाने वैद्यकीय सेवेसोबतच भावनिक उपचार मिळण्यास मदत होते. रुग्ण हे एकटे नाही ही भावना रुजते. यावेळी लहान मोठे सांस्कृतिक कार्यक्रम, मिठाई वाटप आणि सकारात्मक संवादात्मक सत्राचा समावेश होता.

## एकलव्य एकल विद्यालय प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन आज
### आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांची उपस्थिती



**नागपूर:** कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेतर्फे दरवर्षी नागपुरात एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण आयोजित केले जातात. यावर्षी ४ ते ७ सप्टेंबर २०२५ दरम्यान रेशीमबाग येथील महर्षी व्यास सभागृह हे वर्ग होणार आहेत. या शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन गुरुवार ४ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६.३० वा. राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात संस्थेच्या मार्गदर्शन मंडळ कार्य करते. त्यात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, हंसराज अहिर, सुधीर मुनगंटीवार, केशवराव मानकर आणि मितेश भांगडिया यांचा समावेश आहे. शिक्षक-पर्यवेक्षकप्रशिक्षण वर्गाचा ७ सप्टेंबर रोजी ५ वा. समारोप होणार असून या समारंभाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच, नोबल पारितोषिक विजेते, चिल्ड्रन्स फाउंडेशन नवी दिल्लीचे कैलाश सत्यार्थी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. असे अतुल शिरोडकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर, कोषाध्यक्ष सीए मिलिंद कानडे व सचिव प्रशांत बोपर्डीकर यांची उपस्थिती होती.

## खेळ खेळल्याने सक्षम बनतात




**कामठी :** मेरा युवा भारत नागपूर, सोसायटी यांच्या संयुक्त विदमाने राष्ट्रीय क्रीडा दिवस २०२५ मोंढा तहसील कामठी जिल्हा नागपूर,या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे, कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रामटेके व निशा गजभिये, सुषमा पाटील, व संस्थेचे अध्यक्ष श्री पंकज खोब्रागडे, यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिवस कार्यक्रमांमध्ये महामाया गर्ल्स हॉस्टेल मधल्या विद्यार्थी इतर या ठिकाणी विद्यार्थीच्या उपस्थितीमध्ये वरील कार्यक्रमात उपस्थित होते, त्यात हॉलीबॉल खेळ खेळिवण्यात आला व सर्व विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व सांगून त्यांनी स्वतः सक्षम कसे करता येईल शरीर कसे मजबूत करता येईल याबाबत माहिती देण्यात आली व कार्यक्रमात चहा नाश्ता घेऊन कार्यक्रम संपविण्यात आला.

## निधन वार्ता



**सुशीलाबाई गंथाडे**
**वाडी, ३ सप्टेंबर**
बजरिया, नागेश्वर मंदिर जवळ, नागपूर रहीवाशी सुशीलाबाई गोपीचंद गंथाडे यांचे निधन झाले. त्या ७८ वर्षाच्या होत्या.त्यांच्या पश्चात पती,मुले व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर बुधवारी मोक्षधाम घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आला. त्या आमदार समीर मेघे यांचे स्वीय सहाय्यक विजय गंथाडे यांच्या मातोश्री होत.

## काटोल, नरखेड तालुक्यात बोगस कामे

# बांधकामांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

### नागरिकांची तीव्र नाराजी : उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशीची मागणी



■ **स्वप्नील राऊत, काटोल, दि. ३ :** तालुक्यातील कोंढाळी नगरपंचायत क्षेत्रातील अंबिकानगरसह इतर चार ठिकाणी सुरू असलेल्या रस्ता विकास कामात गंभीर अनियमिततेच्या तक्रारी आल्यावर आमदार चरणसिंग ठाकूर यांनी प्रत्यक्ष स्थळाला भेट दिली. पाहणीत कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ संबंधित कंत्राटदारास काम थांबविण्याचे आदेश दिले.

जागरूक नागरिकांच्या तक्रारीनंतर संपूर्ण विधानसभा क्षेत्रातील बांधकामांच्या दजार्बाबत शंका उपस्थित करणारे असल्याचे स्पष्ट झाले आहे. काटोल, नरखेड तालुक्यातील सुरू असलेल्या व पूर्ण झालेल्या सर्व कामांची उच्चस्तरीय चौकशी समिती मार्फत तपासणी करणे अत्यावश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

काटोल व नरखेड हे कृषीप्रधान तालुके. येथे मागील काही वर्षांत कोट्यवधींच्या खर्चाने रस्ते, सिमेंट काँक्रीट मार्ग, पूल, पांदन रस्ते, शासकीय, अर्धशासकीय इमारती, शाळा व रुग्णालये उभारण्यात आली. मात्र, नवनवीन रस्ते काही महिन्यांतच खड्डेमय झाले. नव्याने बांधलेले पूल व इमारतींना भेगा पडल्याचे अनेक उदाहरणे समोर आली आहेत.

या कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे सिमेंट, वाळू, खडी व स्टीलचा वापर केला जात असून, डांबराऐवजी माती किंवा डिझेल मिसळून काम केले जात असून, मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी जाडीचे रस्ते तयार केले जात आहेत, योग्य कम्पॅक्शन न करता थर टाकणे, क्युरिंग न करता काँक्रीट व पूल पूर्ण करणे असा प्रकार सुरू असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत.

मोजणी पुस्तिकेत फसवणूक करून संगनमताने काम पास करण्याचा प्रकार सर्वत्र सुरू असून, चेकलिस्टनुसार बांधकाम साहित्याची गुणवत्ता व प्रमाण तपासावे, रस्त्यांची जाडी, रुंदी व थर तपासणी करावी, कम्पॅक्शन, क्युरिंग व ड्रेनेजची खात्री करावी, मोजणी पुस्तिका व प्रत्यक्ष कामाची तुलना करून आर्थिक हिशेब व बिलांची चौकशी केली जावी, अशी स्थानिक पत्रकार व सामाजिक संस्था यांची मागणी आहे. ग्रामीण भागातील ग्रामस्थांचा आरोप आहे की, अनेक ठिकाणी कंत्राटदारांना राजकीय आश्रय मिळत असल्यामुळे गुणवत्तेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होते. वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नाही; त्यामुळे स्वतंत्र चौकशी समिती हाच शेवटचा उपाय आहे, असे सामाजिक संस्थांचे म्हणणे आहे.

कोट्यवधींचा निधी नेमका कुठे, कसा व किती वापरला? संबंधित काम मानक व नियमांनुसार झाले का? पूल, शाळा, रुग्णालये सुरक्षिततेच्या निकषांनुसार आहेत का? निकृष्ट काम पास करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई का झाली नाही? या चार मुख्य मुद्यांवर चौकशीची दिशा केंद्रीत करण्याबरोबरच प्रत्येक प्रकल्पाची स्वतंत्र चौकशी करून दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई केली जावी, थर्ड-पार्टी ऑडिट सक्तीचे करावे, बांधकाम कामांची माहिती नागरिक व पत्रकारांना द्यावी, चौकशी समितीने विशेष भर द्यावा, अशी मागणी सामाजिक संस्थांनी केली आहे.

## वळणामुळे वाढले अपघात



### लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन ते ईसासनी मार्गावरील अतिक्रमण काढा

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ३ :** डिगडोह नगर परिषद अंतर्गत लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन ते ईसासनी मार्गावर वैशाली नगरकडे वळताना एका कॉलेज ने केलेल्या अतिक्रमणमुळे आंधळे वळण तयार झाले असून या ठिकाणी अपघात वाढले आहेत.

नगर परिषदने तात्काळ हे अतिक्रमण हटवून मार्ग मोकळा करावा अशी मागणी डिंगडोह जागृती मंच च्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी रामेश्वर पंडागळे यांना निवेदनातून केली आहे. लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन पासून ईसासनी कडे जाणाऱ्या मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढली असून वैशाली नगर, जयताळा, नागपूर शहर कडे जाणारे वाहनचालक या रस्त्यावरून वळतात. मात्र येथील एका कॉलेजने अतिक्रमण केल्याने हे वळण धोकादायक झाले आहे. हे अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे डिगडोह जागृती मंचातर्फे आंदोलनाचा इशारा संघटनेचे पदाधिकारी मोनू सिंग, गजानन व्यवहारे, जितू मेश्राम, सतीश कनेरकर, व्यंकटेश पांडलवार, ब्रिजेश मौर्या, नरेश टेंभरे, ताणेश्वर चौधरी, रवी चतुर्वेदी, नवलसिंग यांनी दिला आहे.



■ **नागपूर :** *लाकडी पूल, नागपूर येथील निवासी सौ. दिशा राजेश पराते यांच्या निवासस्थानी स्थापन करण्यात आलेले गणराया.*



■ **नागपूर :** *गोदावरी गणेश उत्सव मंडळ दुर्ग रोड, सदर, नागपूर येथील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाचा गणपती.*

## शनिवार बाजार रोड परिसरात रस्त्यावर जागोजागी खड्डे



महासागर
प्रभाग वार्ता

■ **प्रदीप पौनीकर, नागपूर, दि. ३ :** प्रभाग क्र. ५, नवी मंगळवारी, शनिवार बाजार रोड, या परिसरातील रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे मोठे खड्डे पडल्याने नागरिकांना कसरत करत जीवघेण्या खड्ड्यातून धोकादायक प्रवास करावा लागत आहे.

या मार्गावरून रात्रंदिवस नागरिकांचे आवागमन सुरू असते. पाऊस पडल्याने या मार्गावरील खड्डे पाण्याने भरलेले आहेत. त्यामुळे रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आम आदमी पक्षाच्या वतीने रस्ता खराब असल्याची तक्रार अनेकदा सतरंजीपुरा झोनचे सहाय्यक आयुक्त यांना देण्यात आली. तरीसुद्धा प्रशासन जागे झाले नाही.

रस्ता बनवण्याचे काम लवकरात लवकर झाले नाही तर आम आदमी पक्षातर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आम आदमी पक्षाद्वारे देण्यात आला.

यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, संदीप साखरे, केतन ठाकूर, सुनिल गजभिये, मनोज फटींग, लीना गजभिये,क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, आरती दलाल, हरिहर पराते, नागसेन सहारे, सुनिल गजभिये, कृष्णा पाठराबे, योगेश पराते, स्वाती तारवानी, अंशु बिरेवार, संजू पटले, अमोल उके, बाबुराव निमजे, राजकुमार किटाळीकर आणि समस्त आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## हेल्दी लाईफ आणि वेलनेस विषयावर कार्यशाळा




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :** स्कूल ऑफ स्कॉलर्स, हुडकेश्वर येथे इयत्ता ३ ते ५ च्या पालकांसाठी हेल्दी लाईफ आणि वेलनेस या विषयावर एक समृद्ध आणि मार्गदर्शक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ही कार्यशाळा श्रीमती रीता विघे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली, त्या एक अनुभवी आरोग्य सल्लागार व वेलनेस ॲडव्हायझर असून आयुष मंत्रालयाच्या शिफारसीने आमंत्रित करण्यात आल्या होत्या. समाजसेवक श्री. प्रशांत पाटील हे देखील उपस्थित होते, त्यांनी सर्वांगीण आरोग्य जीवनशैली स्वीकारण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यशाळा अत्यंत संवादात्मक, माहितीपूर्ण आणि विचारप्रवृत्त करणारी होती. पालकांना संतुलित आहार, तणाव व्यवस्थापन, वेलनेस सवयी आणि निरोगी जीवनशैली यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले, जे त्यांच्या आणि त्यांच्या मुलांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरेल.

कार्यक्रमाला प्राचार्य सौ. आरती चौबे, उपप्राचार्य सौ. प्रियंका बोंबड, ॲड पंकज कनोझे यांची उपस्थिती लाभली. त्यांनी पालकांना निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास प्रोत्साहित केले आणि वक्त्यांनी दिलेल्या मौल्यवान मार्गदर्शनाचे कौतुक केले.

## दक्षता समिती अध्यक्षपदी संतोष तिजारे यांची नियुक्ती

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाने कामठी तालुक्यातील बिडगाव नगर पंचायत येथील दक्षता समितीच्या अध्यक्षपदी संतोष तिजारे यांची नियुक्ती कामठी तहसीलदार यांच्या वतीने करण्यात आली.



समाज सेवक रजत पराते यांनी आवास योजनेच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. संतोष तिजारे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी आमदार टेकचंद सावरकर, महामंत्री अनिल निधान, रमेश चिकटे, सचिन घोरमाडे भाजप तालुका अध्यक्ष निलेश कातुरे व ज्येष्ठ नेत्यांचे आभार मानले.

## नझूल लेआउटमध्ये घाणीचे साम्राज्य



■ **प्रमोद जांभुळकर, नागपूर, दि. ३ :** स्वच्छ नागपूर ही मनपाची हाक केवळ घोषवाक्यापुरतीच राहिली आहे का? असा संतप्त सवाल नझूल लेआउट परिसरातील नागरिक करत आहेत. प्रभाग क्रमांक २ अंतर्गत मेकोसाबाग ते नझूल लेआउट रोडवर सध्या प्रचंड घाण आणि अस्वच्छतेचं साम्राज्य पसरले आहे. रस्त्याच्या कडेला घाण पाणी सतत वाहत असून जागोजागी कचरा साचलेला आहे.

या भागात एक खेळाचे मैदान आणि हॉल देखील आहे जिथे दररोज अनेक खेळाडू आणि नागरिक भेट देतात. मात्र दुर्गंधीमुळे श्वास घेणेही कठीण झाले असून नागरिकांना नाकावर रुमाल ठेवून जावे लागत आहे. कचऱ्यावर डास व कीटकांचा प्रचंड प्रादुर्भाव झाला असून परिसरात साथीचे आजार पसरू लागले आहेत. स्थानीय नागरिक डॉ. प्रा. अभय शेंडे यांनी सांगितले की नझूल लेआउट कॉलनीतील मैदान आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर अत्यंत दूषित झाला आहे. रस्त्यावरच कचरा टाकण्यात येतो, त्यामुळे वातावरणात रोगराईचा प्रसार झपाट्याने वाढत आहे.

असामाजिक तत्वांचाही वावर या घाणीच्या आडोशाने वाढत असल्याने, रहिवाशांना असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची आणि स्वच्छतेसाठी ठोस उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे. पंकज गजभिये, धनंजय मेश्राम, अरुण सहारे, जितेंद्र मेश्राम, दीपक सहारे, प्रवीण शेंडे या स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला जागे करण्यासाठी एकत्र येत आवाज उठविला आहे.स्वच्छ नागपूर केवळ घोषणा न राहता कृतीत उतरावी, अशी तीव्र मागणी आता जनतेकडून होत आहे.

## उमियाशंकर हायस्कूल येथे हेल्मेटचे वितरण




■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३ :** प्रभास फाउंडेशन आणि आयसीआयसीआय लोम्बार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने क्वेटा कॉलनी येथील उमियाशंकर नारायण हायस्कूल विद्यार्थी व पालकांना हेल्मेट वितरण करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रभास फाउंडेशनचे संचालक सदस्य अश्विनी बजाज आणि रस्ता सुरक्षा च्या मास्टर ट्रेनर व रिटायर्ड प्रिन्सिपल सुनिता बजाज यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शाळेच्या प्राचार्य संतोषी गुप्ता प्रामुख्याने उपस्थित होत्या. बजाज यांनी मार्गदर्शनातून रस्ता सुरक्षा व हेल्मेट च्या वापराबदल मोलाचे असे मार्गदर्शन केले. मान्यवरांचे भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले.

संचालन अंशुल जिचकार यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजनाकरिता शाळेतील शिक्षक सुहासिनी शुद्धलवार, अंशुल जिचकार, अनुराधा सुळे तसेच शिक्षकेतर कर्मचारी मुकेश शाहू, दिवेश बटाविया व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## भीमचौकातील ट्राफिक सिग्नल बंद

### वाहतुक कोंडीचा त्रास : वाहनचालक त्रस्त

■ **प्रभू गजभिये, नागपूर, दि. ११ :** प्रभाग २ , इंदोरा ते नारा आणि दयानंद पार्क ते नागसेन नगरला जोडणाऱ्या महत्त्वाच्या भीमचौकात गेल्या अनेक वर्षांपासून ट्राफिक सिग्नल बंद असल्यामुळे नागरिकांना दररोज वाहतुकीच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे.



सकाळी ९ ते ११ आणि सायंकाळी ५ ते ८ या गर्दीच्या वेळेत या चौकात प्रचंड ट्राफिक जाम होतो, अशी माहिती स्थानिक रहिवासी धीरज गजभिये यांनी दिली. या वेळेत शाळा, कॉलेज, ऑफिसकडे जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असते. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊन अपघाताची शक्यता निर्माण होते. शिवाय, सततच्या वाहनांच्या हॉर्नमुळे ध्वनी प्रदूषणही वाढले आहे.

चौकाच्या चारही बाजूंना अतिक्रमण झाल्यामुळे वाहतूक सुरळीत होण्यात अडथळा निर्माण होतो. यासंदर्भात जरीपटका पोलीस स्टेशन, नागपूर महानगर पालिकेच्या अतिक्रमण विभाग तसेच वाहतूक परिमंडळ इंदोरा येथे अनेक वेळा लिखित तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

कमलेश खांडेकर, शशिकांत बोरकर, रवींद्र वासनिक, सुधीर खोब्रागडे, शशिकांत जांभुळकर, मंगेश राऊळकर, भूपेश कांबळे, देवानंद पाणतावणे, पद्माकर पाटील आदी नागरिकांनी प्रशासनाकडे लवकरात लवकर ट्राफिक सिग्नल कार्यान्वित करण्याची, अतिक्रमण हटवण्याची आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.